सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २१ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३४१ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# अस्पृश्यता आणि विषमता हा मानवतेविरुद्धचा सर्वात मोठा अपराध : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २० मार्च :** माणसाला मानवतेची जाणीव करून देणारा चवदार तळ्याचा सत्याग्रह हा भारताच्या इतिहासातील एक निर्णायक क्षण होता. ज्या विषमतेने आणि अनिष्ठ प्रथांनी विखंडित समाज निर्माण केला, त्याच व्यवस्थेमुळे देशाला शेकडो वर्षे गुलामगिरी सोसावी लागली. मुळात अस्पृश्यता आणि विषमता हा सर्वात मोठा अपराध असून, भावी पिढीला समतेचे मूल्य आणि विषमतेमुळे झालेले नुकसान या दोन्ही गोष्टी समजणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथे केलेल्या ऐतिहासिक सत्याग्रहाला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने आयोजित शताब्दी सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चवदार तळे जलशुद्धीकरण आणि परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. या सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, उद्योगमंत्री उदय सामंत, भरत गोगावले, आमदार प्रवीण दरेकर आदी उपस्थित होते.

ऐतिहासिक संदर्भांचा दाखला देत मुख्यमंत्री म्हणाले की, ३ एप्रिल १९२७ च्या 'बहिष्कृत भारत'मध्ये बाबासाहेबांनी या आंदोलनाची तुलना फ्रेंच राज्यक्रांतीशी केली होती. ज्याप्रमाणे त्या क्रांतीने जगाचा इतिहास बदलला, त्याचप्रमाणे या सत्याग्रहाने भारताचे भविष्य बदलले. आपण वारंवार गुलाम का झालो, याचा विचार केला तर त्या मुळाशी आपल्या समाजातील जातीभेद आणि अस्पृश्यतेसारख्या कुप्रथा होत्या. असा विखंडित समाज नेहमीच पराभूत होतो. जर या प्रथा नसत्या, तर भारत कधीच गुलाम झाला नसता.

या कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी सरकार चवदार तळ्याच्या जतन आणि संवर्धनासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. केवळ जलशुद्धीकरणच नव्हे, तर या परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सरकारने विशेष आराखडा तयार केला आहे. ज्या ठिकाणी बाबासाहेबांनी समतेचा मंत्र दिला, त्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी हे सुशोभीकरण केले जात आहे, असे त्यांनी सांगितले.

# उत्पन्नाच्या तुलनेत 'एसटी'ला दररोज २ कोटींचा तोटा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २० मार्च :** राज्याची जीवनवाहिनी असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (एसटी) सध्या दररोज १ ते २ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा संचित तोटा असलेल्या एसटीला केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून राहणे आता शक्य नाही. या पार्श्र्वभूमीवर, महामंडळाने डिझेल खरेदीत पारदर्शकता आणून वार्षिक २४१ कोटींची बचत साधली असून, आता उत्पन्न वाढीसाठी व्यावसायिक इंधन विक्री आणि जाहिरात क्षेत्रात आक्रमक पाऊल टाकले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटीचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिली.



फेब्रुवारी २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात एसटीला सुमारे ७५० कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. हा तोटा भरून काढण्यासाठी महामंडळाने 'पर्यायी उत्पन्न स्रोत' निर्माण करण्याची विशेष योजना आखली आहे. डिझेल खरेदीच्या निविदा प्रक्रियेत कोणताही राजकीय हस्तक्षेप न होऊ दिल्याने महामंडळाला मोठा आर्थिक फायदा झाला आहे. यापूर्वी प्रति लिटर मिळणारी २.७० रुपयांची सवलत आता ५.१३ रुपयांपर्यंत वाढली आहे. एसटीला वर्षाकाठी ४० कोटी लिटर डिझेल लागते, ज्यावर सुमारे ३ हजार ४०० कोटी रुपये खर्च होतात. नव्या निविदा प्रक्रियेमुळे दरात प्रति लिटर २.१३ रुपयांची अतिरिक्त सवलत मिळाल्याने महामंडळाचे वर्षाला २४१ कोटी रुपये वाचणार आहेत. काही कंपन्यांनी या प्रक्रियेत खोडा घालण्याचा प्रयत्न केला, मात्र न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने महामंडळाच्या पारदर्शक भूमिकेवर शिक्कामोर्तब झाले, असे सरनाईक यांनी नमूद केले.

## भारतीय कॅप्टनचा मृत्यू

नालंदा : पश्चिम आशियातील तणावाचा मानवी परिणाम समोर आला असून होर्मुझच्या सामुद्रधुनीत अडकलेल्या 'अवना' जहाजाचे कॅप्टन राकेश रंजन सिंह यांचे निधन झाले आहे. २८ फेब्रुवारीपासून जहाज समुद्रात अडकले होते आणि तब्बल १८ दिवस तेथेच थांबावे लागले.मूळचे बिहारमधील नालंदा जिल्ह्यातील रहिवासी असलेले सिंह यांचे कुटुंब सध्या रांची येथे राहते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. दि. १८ मार्च रोजी त्यांची प्रकृती अचानक बिघडली. जहाजावरील अधिकाऱ्यांनी दुबई एटीसीकडे एअर ॲम्ब्युलन्सची मागणी केली, मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे परवानगी मिळू शकली नाही. त्यानंतर बोटीने किनाऱ्यावर आणण्याचा प्रयत्न झाला, पण तोपर्यंत उशीर झाला होता. अखेरीस हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

## बस – कंटेनरचा भीषण अपघात

पुणे: पुणे–सोलापूर महामार्गावर पाटसजवळ एका भीषण अपघाताने प्रवाशांच्या काळजाचा ठोका चुकला. सोलापूरहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एसटी बसला एका सुसाट कंटेनरने ओव्हरटेक करण्याच्या नादात जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, एसटी बस महामार्गाच्या कडेला जाऊन थेट उलटली. मात्र, या भीषण अपघातात नियतीने साथ दिली आणि बसमधील ४४ प्रवासी मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर पडले. सोलापूर–पुणे ही एसटी बस आपल्या मार्गाने जात असताना एका भरधाव कंटेनरने चालकाच्या बाजूने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला.

## श्रीलंकेच्या पंतप्रधानांचा ताठ कणा, अमेरिकेची लढाऊ विमानं उतरवण्यास परवानगी नाकारली

**कोलंबो/वृत्तसंस्था :** मध्य पूर्वेत पेटलेल्या युद्धाचे परिणाम जगभरात दिसू लागले आहेत. अमेरिकेच्या नौदलाच्या युद्धनौका, विनाशिका अलर्ट मोडवर आहेत. आखाती देशांमध्ये असलेल्या सैनिकी तळांचा वापर अमेरिका इराणच्या विरोधात करत आहे. त्यानंतर आता अमेरिकेनं त्यांची लढाऊ विमानं श्रीलंकेत उतरवण्याचा प्रयत्न केला. पण तो अपयशी ठरला. श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा दिसानायके यांनी अमेरिकेच्या लढाऊ विमानांना उतरण्याची परवानगी दिली नाही.

इराण विरुद्ध युद्ध सुरु असताना अमेरिकेला त्यांची दोन लढाऊ विमानं श्रीलंकेच्या आग्नेय भागात असलेल्या मट्टाला आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरवायची होती. पण अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांनी स्पष्ट शब्दांत परवानगी नाकारली. याबद्दलची घोषणा अध्यक्षांनी शुक्रवारी संसदेत केली. 'जिबुतीहून अमेरिकेच्या दोन लढाऊ विमानांनी ४ आणि ८ मार्चला श्रीलंकेत लँड करण्याची परवानगी मागितली होती. पण श्रीलंकेनं या दोन्ही विनंती स्वीकारल्या नाहीत,' अशी माहिती दिसानायके यांनी संसदेत दिली.

'लढाऊ विमानांना उतरवण्यासाठी बरेच दबाव टाकण्यात आले. पण आपण तटस्थ राहिलो. आपण झुकलो नाही. झुकणारही नाही. मध्य पूर्वेतील युद्धामुळे आव्हानांचा सामना करावा लागत आहे. यामध्ये तटस्थ राहण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत,' असं दिसानायके यांनी संसदेत सांगितलं.

'जहाज विरोधी क्षेपणास्त्र असलेली दोन लढाऊ विमानं त्यांना जिबुतीमधील हवाई तळावरुन मट्टाला आंतरराष्ट्रीय विमानतळावर आणायची होती. पण आपण त्याला साफ नकार दिला,' अशी माहिती अध्यक्षांनी दिली. दक्षिण आणि मध्य आशियासाठी अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी कालच दिसानायके यांची भेट घेतली.

## बारामती पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार देणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २० मार्च :** राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होईल, असा कयास बांधला जात असताना, काँग्रेसने या निवडणुकीत उमेदवार देण्याची भूमिका घेतली आहे. शरद पवार गट ही निवडणूक लढवणार नसेल, तर त्यांनी भूमिका स्पष्ट करावी, आमच्याकडे पर्याय तयार आहे, असे विधान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

महाड येथील चवदार तळे सत्याग्रह दिन कार्यक्रमाच्या निमित्ताने रायगडमध्ये माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. सपकाळ म्हणाले, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत बारामतीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने लढवली होती. त्यामुळे पोटनिवडणूक लढवण्याबाबत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. ते जर लढत नसतील, तर आमच्याकडे अनेक पर्याय आहेत. अंतिम निर्णय हा महाविकास आघाडी घेईल, असेही त्यांनी सांगितले. केंद्रीय निवडणूक आयोगाने बारामती विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक जाहीर केली असून, ६ एप्रिलपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. २३ एप्रिलला मतदान होईल, तर ४ मे रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडेल.

राष्ट्रवादीकडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार उमेदवार असतील, हे निश्चित आहे. त्याचबरोबर काँग्रेससह ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही ही पोटनिवडणूक लढण्याची घोषणा केली आहे. सुनेत्रा पवार यांना विधान परिषदेवर घ्यावे आणि बारामतीत पवार घराण्याव्यतिरिक्त अन्य कोणताही उमेदवार द्यावा, असे हाके म्हणाले.








हिंगोली : भारतीय जनता पार्टीचे राज्यसभेचे नुतन खासदार रामराव वडकुते यांचा शुक्रवारी हिंगोली येथे दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वतीने हृद्य सत्कार केला. यावेळी मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, हिंगोली शहर प्रतिनिधी तथा प्रेस फोटोग्राफर विजय गुंडेकर.




# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर; लातूर पोलिसांचा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये शेतजमिनीच्या बांधावरून, शेतरस्त्यांवरून तसेच मालकी हक्कांवरून उद्भवणारे वाद अनेक वेळा गंभीर स्वरूप धारण करतात. अशा वादांमुळे शेतकऱ्यांमध्ये तणाव निर्माण होऊन परस्परविरोधी तक्रारी दाखल होतात व काही वेळा गुन्हेगारी घटनांनाही खतपाणी मिळते. या सर्व प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना पोलीस ठाणे, न्यायालयीन कामकाज यामुळे मानसिक त्रास सहन करावा लागतो आणि न्यायासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागते.

ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींचा अत्यंत संवेदनशीलतेने विचार करून पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर हा अभिनव व लोकाभिमुख उपक्रम दिनांक १६ मार्च २०२६ पासून सुरू केला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेताना एक महत्त्वाची बाब अधोरेखित केली की, शेतकऱ्यांसाठी त्यांची जमीन ही केवळ मालमत्ता नसून ती त्यांच्या आयुष्याचा आधार, कष्टाचे प्रतीक आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन आहे.शेतीच्या छोट्या-छोट्या कारणांवरून निर्माण होणारे वाद वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात, त्यातून शेजारी शेजाऱ्यांचे संबंध बिघडतात, आणि काही वेळा किरकोळ वाद मोठ्या गुन्ह्यांत परिवर्तित होतात. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी केवळ कायदेशीर कारवाई करण्याऐवजी मानवी दृष्टीकोनातून, संवादातून व सामोपचारातून प्रश्न सोडवण्यावर भर दिला आहे.



# रेणापूर व मुरुडच्या तंट्यासह ४९ तंटे सामंजस्याने निकाली

## पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** लातूर पोलीस दलाच्या 'पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर' या उपक्रमाला जिल्हाभरात अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. लातूर तालुक्यातील मुरुड आणि रेणापूर तालुक्यातील एकूण ४९ तंटे या उपक्रमाअंतर्गत सामंजस्याने सोडविण्यात यश आले आहे. या उपक्रमाचे जिल्हाभरातून स्वागत होत आहे.



ग्रामीण भागातील जमीन व शेतीसंदर्भातील वादांमुळे सामाजिक तणाव निर्माण होऊन अनेक वेळा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न्न निर्माण होतो. असे वाद वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्यामुळे शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक व सामाजिक त्रास सहन करावा लागतो. या पार्श्र्वभूमीवर पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रत्यक्ष शेतात जाऊन वाद निवारण करण्याच्या या उपक्रमातून अत्यंत प्रभावी परिणाम दिसून येत आहेत. रेणापूर पोलीस ठाणे - दोन वर्षांपासून प्रलंबित वादाचा शेवट रेणापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेहरू नगर शिवारामध्ये अर्जदार सोमनाथ रमेश भोसले यांनी शेती रस्त्याच्या वादासंदर्भात तक्रार दाखल केली होती. सदर वाद हा अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात मागील दोन वर्षांपासून सुरू होता. या कालावधीत परस्परांविरुद्ध ४ वेळा एनसी दाखल झाल्या होत्या. शेतात जाण्यासाठी १० फूट रुंदीचा रस्ता देण्याच्या मुद्द्यावरून वारंवार वाद, भांडणे व पोलीस तक्रारी होत होत्या; मात्र कायमस्वरूपी तोडगा निघत नव्हता.या उपक्रमांतर्गत पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी स्टाफसह प्रत्यक्ष शेतात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. गावातील प्रतिष्ठित नागरिक व दोन्ही पक्षकारांना समोरासमोर बसवून सखोल चर्चा करण्यात आली. वादाचे मूळ कारण समजून घेऊन, सामाजिक सलोखा जपण्याच्या दृष्टीने व कायदेशीर बाबींचा विचार करून दोन्ही पक्षांची समजूत काढण्यात आली. परिणामी, दोन्ही पक्षांच्या संमतीने सामोपचाराने वाद कायमचा मिटविण्यात आला, ज्यामुळे दोन वर्षांपासून सुरू असलेला तणाव पूर्णतः समाप्त झाला.

मुरुड पोलीस ठाणे

मुरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोसा येथे शंकर रंगराव खोसे, भीमराव रंगराव खोसे व लक्ष्मण व्यंकट खोसे यांच्यात ८ ते १० वर्षांपासून शेत रस्त्याचा वाद सुरू होता.या वादाच्या अनुषंगाने यापूर्वी न्यायालयीन प्रक्रिया, तहसीलदार स्तरावरील सुनावणी, पोलीस ठाण्यात तक्रारी तसेच उपोषण व आत्मदहनाचे निवेदन देण्यात आले होते. तरीही वाद निकाली निघत नव्हता.दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी तहसीलदार सौदागर तांदळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक उजगरे, पोलीस व महसूल कर्मचारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करण्यात आली. सुमारे ५ तास सखोल चर्चा करून शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत रस्ता व नाली तयार करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व संबंधितांच्या संमतीने हा दीर्घकालीन वाद सामंजस्याने मिटविण्यात आला. यामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेला वाद संपुष्टात येऊन संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला.

या मोहिमेदरम्यान अवघ्या पाच दिवसांत ४९ जमीन व शेती वादांचा सामंजस्याने निपटारा करण्यात आला असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले वाद यशस्वीरीत्या मिटविण्यात आले आहेत. पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर हा उपक्रम केवळ वाद निवारणापुरता मर्यादित नसून, ग्रामीण भागात विश्र्वास निर्माण करणारा, संवेदनशील व परिणामकारक पोलिसिंगचा आदर्श नमुना ठरत आहे. जमीन व शेतीसंदर्भातील वाद असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा लाभ घ्यावा व सामंजस्याच्या माध्यमातून वाद मिटविण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन लातूर पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# लातुरात डॉ. भूषण शुक्ल यांच्या उपस्थितीत पालकशाळेचे आयोजन : डॉ. मिलिंद पोतदार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** पुण्याचे ख्यातनाम बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी लातुरात 'तंत्रज्ञान युगातील पालकत्व - कानगोष्टी पालकत्वाच्या' या विषयावरील पालकशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेस लातूर शहर व परिसरातील पालकांनी आवर्जून उपस्थित रहावे , असे आवाहन संयोजक सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च लातूरचे संचालक डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. मुग्धा पोतदार यांनी केले आहे.



सद्यस्थितीत समाजात अनेक पातळीवर बदल होत असलेले पाहावयास मिळतात. प्रत्येक पालक आपआपल्या परीने पाल्यांना सर्व काही उत्कृष्ट दर्जाचे देण्याचा प्रयत्न करत असतात. आपल्या पाल्याचे भवितव्य उज्वल घडावे, तो समाजात एक आदर्श नागरिक म्हणून घडावा यासाठी पालक जीवाचे रान करताना दिसतात. तरीही मुलांना घडविताना , वाढविताना पालकांनाही अनेक प्रश्र्नांचा सामना करावा लागतो. त्यांनाही अनेक प्रश्र्न पडतात. पालकांना येणाऱ्या अडचणीवर मात करण्याचे कानमंत्र या आगळ्यावेगळ्या पालकशाळेच्या माध्यमातून डॉ. भूषण शुक्ल देणार आहेत. मुलांना वाढविताना जाणते - अजाणतेपणे पालकांकडून होणाऱ्या चुकांबद्दल ते यावेळी कानउघाडणीही करणार आहेत.

रविवारी सायंकाळी पाच वाजता दगडोजीराव देशमुख सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात डॉ. भूषण शुक्ल यांच्यासोबत पालकांनाही संवादही साधता येणार आहे. हा कार्यक्रम स्वर, लातूर, अंतरंग व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र आणि सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च लातूरच्या संयुक्त विद्यमाने पार पडणार आहे. या पालकशाळेस जास्तीत जास्त पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## साई मंदिरात माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते आरती



**लातूर :** लातूर येथील विशाल नगर भागातील श्री साई मंदिरात गुढीपाडवा निमित्ताने गुरुवारी सायंकाळी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी साईबाबा चे दर्शन घेतले त्यानंतर त्यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे , रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव,रामदास पवार सचीन दाताळ बाजीराव संभाजी सुळ शिवाजी कांबळे गोविन्द डुरे, ज्ञानेश्वर भिसे,रमेश सुर्यवंशी अमोल शिंदे महेंद्र भादेकर, सुपर्ण जगताप डॉ आनंद पवार विकास देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## लातूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ ची ३० उमेदवारांची तातपुरती निवड व प्रतीक्षा यादी जाहीर

**लातूर :** लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ अंतर्गत गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय ३० उमेदवारांची तात्पुरती (Provisional) निवड यादी तसेच प्रतीक्षा यादी दिनांक १९ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आली आहे. सदर यादी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळ https://laturpolice.gov.inG$ वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

या भरती प्रक्रियेमध्ये मैदानी चाचण्या, लेखी परीक्षा व इतर सर्व टप्पे अत्यंत काटेकोरपणे, पारदर्शक पद्धतीने व नियमानुसार पार पाडण्यात आले. मा. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण प्रक्रिया सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी व वेळेचे अचूक व्यवस्थापन यामुळे अल्पावधीत पूर्ण करण्यात आली. विशेष म्हणजे, राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत लातूर जिल्हा पोलीस दलाने सर्वप्रथम तात्पुरती निवड यादी जाहीर करण्याचा मान मिळविला आहे. ही बाब लातूर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे, पारदर्शकतेचे व उत्तरदायित्वाचे द्योतक आहे. गुढीपाडवा व रमजान ईद या सणांच्या पूर्वसंध्येला ही निवड यादी जाहीर झाल्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांसाठी हा क्षण अत्यंत आनंददायी व त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. दीर्घ काळ मेहनत घेऊन स्पर्धात्मक प्रक्रियेत यश मिळवलेल्या उमेदवारांच्या कुटुंबीयांमध्ये देखील समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर निवड ही तात्पुरती (Provisional) असून पुढील कागदपत्र पडताळणी व आवश्यक शासकीय प्रक्रियांच्या अधीन राहील. उमेदवारांनी पुढील सूचनांसाठी नियमितपणे अधिकृत संकेतस्थळाला भेट देणे आवश्यक आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाने राबविलेली ही भरती प्रक्रिया राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी एक आदर्श नमुना ठरत असून, नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाबद्दल विश्वास व सकारात्मकता निर्माण करणारी ठरली आहे.

# दिशा प्रतिष्ठानचा सहावा वर्धापन दिनानिमित्त मोफत शस्त्रक्रिया शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** मानवतेच्या सेवेचा वसा जपत शिक्षण व आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या दिशा प्रतिष्ठानच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त भव्य मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवार दि. २१ मार्च ते २१ एप्रिल कालावधीत संपन्न होणार असून दररोज सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत क्रीडा संकुल लातूर येथील दिशा प्रतिष्ठान च्या मुख्य कार्यालयात नोंद करणे अनिवार्य आहे.

या शिबिरामध्ये अँजिओप्लास्टी, कॅन्सर, प्रोस्टेट ग्रंथी, मुतखडा, मणक्याचे आजार तसेच ब्रेन ट्यूमर यांसारख्या गंभीर आजारांवर १००% मोफत शस्त्रक्रिया (औषधांसह) करण्यात येणार आहेत.

मणक्यातील नस दाबणे, गॅप येणे किंवा गाठी सरकणे अशा समस्यांवरही उपचार उपलब्ध राहणार आहेत. मात्र फक्त अँजिओग्राफीसाठी ५००० शुल्क आकारले जाणार आहे.

याशिवाय हाडे, डोळे, कान-नाक-घसा, जनरल व स्त्रीरोग संबंधित शस्त्रक्रियांवर ५०% सवलत (औषधाविना) देण्यात येणार आहे.

शस्त्रक्रिया लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटल, पोद्दार हॉस्पिटल, काळे हॉस्पिटल, गोरे हॉस्पिटल, सारडा हॉस्पिटल, सिग्मा आय हॉस्पिटल, हार्मोनी हॉस्पिटल, येथे केल्या जाणार आहेत. तसेच लॅब तपासण्या-रक्त, सीटी स्कॅन व एमआरआय-५०% सवलतीत उपलब्ध असतील.

रुग्णांनी नोंदणी करताना जुने वैद्यकीय रिपोर्ट, राशन कार्ड व आधार कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. नोंदणी दिशा प्रतिष्ठानच्या लातूर येथील मुख्य कार्यालयात करावी लागणार आहे.

अधिक माहितीसाठी दिशा प्रतिष्ठान चे अध्यक्ष सोनू डगवाले, इसरार सगरे, डॉ. वैशाली यादव, विष्णुदास धायगुडे, जब्बार पठाण, अजय शहा यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन

प्रतिष्ठान च्या वतीने अभिजीत देशमुख, डॉ अशोक पोद्दार, डॉ चेतन सारडा, संतोष देशमुख, प्रसाद उदगीरकर, किशोर भुजबळ, अविनाश कामदार, रतन बिदादा, प्रसाद जोशी, महेश मालपाणी, पप्पू घोलप यांनी केले आहे.

# मतदार यादीचा सखोल पुनरिक्षण कार्यक्रम लवकरच सुरू होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** भारत निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यात मतदार यादीचा सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रम लवकरच सुरू होत आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी मतदार यादी अद्ययावत करण्याचे महत्त्वाचे कामे सुरू झाली असून, मतदारांना सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

या अनुषंगाने १) Blurr Photo (धूसर किंवा अस्पष्ट छायाचित्र दुरुस्त करणे), २) DSE (Demographically Similar Entries - समान लोकसंख्याशास्त्रीय नोंदी तपासणी व दुरुस्ती), ३) SIR Mappins (मतदारांचे २००२ च्या मतदार यादीशी नकाशा संलग्नीकरण/मॅपिंग) आणि Book a Call (BLO सोबत कॉल बुकिंग) इत्यादी कामे तात्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे. हे कामे प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (Booth Level Officer - BLO) यांनी आपल्या नेमणुकीच्या क्षेत्रातील मतदारांना समक्ष भेटून लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## मतदारांनी बीएलओ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन

२३५ लातूर शहर विधानसभा मतदार संघ आणि २३४ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सर्व मतदारांनी आपल्या रहिवासी मतदान केंद्रातील बीएलओ यांच्याशी समक्ष भेट घेऊन वरील कामे पूर्ण करून घ्यावीत. याशिवाय मतदार नावातील दुरुस्ती, वगळणी (Deletion) किंवा इतर आवश्यक बदलांसाठीही बीएलओ यांच्याकडे संपर्क साधावा. SIR Mapping चे काम २१ मार्च २०२६ नंतरही सुरू राहणार आहे. २००२ च्या मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://voters.eci.gov.in/searchInSIR/S2U-4DPDF-JK4QWODSE या अधिकृत लिंकचा वापर करावा. मतदारांनी मतदार यादीच्या या सखोल पुनरिक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक राहण्यास मदत करावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## जिल्ह्यात रमजान ईदनिमित्त मद्यविक्री बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** जिल्ह्यात २१ मार्च, २०२६ रोजी एक दिवस पुढे मागे चंद्र दर्शनानुसार मुस्लिम बांधवातर्फे रमजान ईद साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त लातूर जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिले आहेत. मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ नुसार तसेच नमुद कायद्यांतर्गत केलेल्या विविध नियमानुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी करण्यास कुचराई करणाऱ्या अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकाविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व अनुषंगिक नियमांच्या आधारे कडक कारवाई करण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

# दयानंद विज्ञानच्या आर्यन गिरवलकरला राष्ट्रीय युवक महोत्सवात स्किट कलाप्रकारात द्वितीय पारितोषिक

## दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील बी.एस्सी.बी.टी.तृतीय वर्षातील आर्यन गिरवलकर या विद्यार्थ्याने स्किट (लघुनाटिका) या कलाप्रकारात चेन्नई येथे पार पडलेल्या राष्ट्रीय युवक महोत्सवात द्वितीय क्रमांक मिळविलेला आहे.सदरील राष्ट्रीय युवक महोत्सवात नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने तब्बल २६ वर्षानंतर सुवर्णझेप घेत व ऐतिहासिक यश मिळवित देशातील आठ झोनमधील १४२ नामांकित विद्यापीठांमध्ये झालेल्या चुरशीच्या लढतीत विद्यापीठाने एकूण सात कलाप्रकारात यश मिळविलेले आहे.त्यामध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयातील आर्यन गिरवलकर या विद्यार्थ्याने स्किट या एका कलाप्रकारात द्वितीय क्रमांक मिळवून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे, दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर झळकाविलेले आहे.





त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी त्याचे अभिनंदन केले तसेच संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते त्याचा यथोचित सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी,कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, डॉ.कोमल गोमारे, प्रा.कविता जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.याचबरोबर स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ.अशोक महाजन यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी त्याचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

यापूर्वी दयानंद विज्ञानच्या आर्यन गिरवलकर याने आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव- २०२५ मध्ये मिमिक्री (नक्कल) या कलाप्रकारात पहिले पारितोषिक मिळविले.आंतर विद्यापीठ युवक महोत्सव (इंद्रधनुष्य) २०२५ मध्ये माईम (मूक अभिनय), वन ॲक्ट प्ले (एकांकिका) तसेच मिमिक्री (नक्कल) या कलाप्रकारात आपला सहभाग नोंदविला. ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सेंट्रल झोनल युवक महोत्सवमध्ये स्किट (विडंबन) या कलाप्रकारात द्वितीय पारितोषिक तसेच क्रिएटिव्ह डान्स याही कलाप्रकारात सहभाग नोंदवून द्वितीय पारितोषिक मिळविले.तसेच सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई,एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर व कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, जळगाव येथील विद्यापीठाच्या स्पर्धेतही त्यांनी घवघवीत यश मिळविलेले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### राजगोपालचारी उद्यानाची महापौर सय्यद इकबाल यांनी केली पाहणी

**परभणी,दि.१६(प्रतिनिधी) :** महानगरपालिकेच्या राजगोपालचारी उद्यानाची महापौर सय्यद इकबाल यांनी सोमवारी (दि.१६) पहाटे ६ वाजता भेट देऊन पाहणी केली. यावेळी उद्यानात सकाळच्या व्यायामासाठी व मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच युवक-युवतींशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि त्या तात्काळ सोडविण्याचे आश्वासन दिले.

महापौर सय्यद इकबाल यांनी यापूर्वीही उद्यानाची पाहणी केली होती. सोमवारी पुन्हा पहाटेच उद्यानात जाऊन त्यांनी विविध सोयी-सुविधांचा आढावा घेतला. लहान मुलांसाठी असलेल्या खेळण्यांचीही त्यांनी तपासणी केली. काही खेळण्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पालकांनी आपल्या लहान मुलांना खेळण्यांकडे नेताना त्यांना दुखापत होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही महापौरांनी केले. उद्यानात येणाऱ्या नागरिकांनी स्वच्छतेची काळजी घ्यावी, असे सांगत महापालिकेच्या वतीने राजगोपालचारी उद्यानात स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उद्यान निरीक्षक मोहम्मद अथर यांना उद्यानाच्या वेळांबाबतही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. सकाळी वॉकसाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच युवक-युवतींची संख्या लक्षात घेऊन उद्यानाची तीनही मुख्य प्रवेशद्वारे सकाळी ५.३० वाजता उघडण्यात यावीत व सकाळी ९.०० वाजता बंद करण्यात यावीत. तसेच सायंकाळी ४.०० वाजता उद्यान पुन्हा खुले करून रात्री ९.०० वाजता बंद करण्यात यावे, असे आदेश महापौरांनी दिले. या निर्णयामुळे आता राजगोपालचारी उद्यान सकाळी ५.३० ते ९.०० आणि सायंकाळी ४.०० ते रात्री ९.०० या वेळेत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच युवक-युवतींना फिरण्यासाठी व मॉर्निंग वॉकसाठी उद्यानाचा अधिक चांगल्या प्रकारे लाभ घेता येईल, असे महापौर सय्यद इकबाल यांनी यावेळी सांगितले.

### महानगरपालिकेच्या स्विकृत सदस्यपदासाठी तीन अर्ज दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीसाठी सोमवार १६ मार्चपर्यंत महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्याकडे एकूण तीन अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत विशेष समिती व नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत राज्य शासनाने २३ मार्च २०२३ रोजी जारी केलेल्या राज्यपत्रातील अधिसूचनेनुसार या नियुक्त्या करण्यात येणार आहेत. या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाच्या वतीने गटनेत्या सौ. तिरूमला मुकुंद खिल्लारे यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी शेषेराव भरोसे यांचा नामनिर्देशित सदस्य म्हणून अर्ज आयुक्तांकडे दाखल करण्यात आला. यावेळी गटनेत्या तिरूमला मुकुंद खिल्लारे, शिवाजी भरोसे, मुकुंद खिल्लारे, पप्पू गायकवाड आदी उपस्थित होते.

तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने गटनेते विजयराव जामकर यांनी शेख फहाद शेख हमीद यांचा नामनिर्देशित सदस्य म्हणून अर्ज सादर केला. यावेळी विजयराव जामकर, शेख फहाद शेख हमीद, बाळासाहेब बुलबुले, अक्षय देशमुख, आकाश लहाणे, अब्दुल कमील, अब्दुल रहीम, अर्जुन सामाले, शेख वसीम, आखिल काजी आदी उपस्थित होते.

याशिवाय राहुल मुरकुटे यांनीही नामनिर्देशित सदस्यपदासाठी स्वतंत्र अर्ज दाखल केला. या वेळी सागर गंगाळे, मोहम्मद फारुख, बबलू टाक, मिलिंद बामणीकर, रितेश जैन आदी उपस्थित होते. अर्ज सादर करताना महानगरपालिकेचे माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव हेही उपस्थित होते.

### महापालिकेच्या पथकाद्वारे मोकाट श्वान पकडण्याची मोहिम : पथकाची स्थापना

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या वतीने शहरातील मोकाट श्वानांचा वाढता त्रास लक्षात घेऊन श्वान पकडण्याच्या मोहिम सुरु करण्यात आली असून त्याकरीता विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे उद्घाटन सोमवार १६ मार्च रोजी दुपारी ३ वाजता महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख आणि आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

यावेळी बोलताना महापौर सय्यद इकबाल यांनी सांगितले की, शहरात मोकाट श्वानांची संख्या वाढत असल्यामुळे नागरिकांकडून वारंवार निवेदने येत होती. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या वतीने पाच सदस्यांचे विशेष श्वान पकड पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक शहरातील विविध भागात फिरून मोकाट श्वानांना पकडेल आणि त्यांची नसबंदी करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

उपमहापौर गणेश देशमुख यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शहरात मोकाट श्वानांचा सुळसुळाट वाढल्यामुळे लहान मुले तसेच नागरिकांना चावा घेण्याच्या घटना वाढल्या असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी श्वान पकड पथकाची स्थापना महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांनीही पथकातील सदस्यांना आवश्यक सूचना दिल्या. शहरातील प्रत्येक कॉलनीमध्ये जाऊन मोकाट श्वानांना पकडावे, तसेच नागरिकांकडून ज्या भागातून तक्रारी किंवा कॉल प्राप्त होतील त्या ठिकाणी तात्काळ जाऊन कारवाई करावी. पकडलेल्या श्वानांची नसबंदी करून त्यावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या उद्घाटन प्रसंगी शेख वसीम, आमोल जाधव, माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव, पथक प्रमुख विनय ठाकूर, शंकर भागवत तसेच महानगरपालिकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

### अबोल जीवांच्या संरक्षणासाठी वर्धमान संस्कार धाम सदैव ठाम - राजूभाई शाह :

**परभणी,/प्रतिनिधी :** अबोल जीवांची रक्षा आणि जीवदयेच्या सन्मानासाठी वर्धमान संस्कार धाम, मुंबई सदैव ठामपणे उभे राहील, असे प्रतिपादन संस्थेचे प्रमुख राजूभाई शाह यांनी केले.

गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगांव येथील छत्रपती शिवाजी महाराज गोशाळेत रविवार १५ मार्च २०२६ रोजी गोरक्षक व गोशाळा संचालकांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी विविध जिल्ह्यांतून आलेल्या गोरक्षक, गोसेवक आणि गोशाळा संचालकांनी गोशाळेमध्ये उभारण्यात आलेल्या गो-आधारित कृषी मॉडेलचे अवलोकन केले.

कार्यक्रमाची सुरुवात गोमाता पूजन व गोग्रास अर्पण करून भक्तिभावाने करण्यात आली. त्यानंतर मंचीय कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी वर्धमान संस्कार धामचे प्रमुख राजूभाई शाह, गोभक्त विकास भाऊ गुंजाळ, कार्यक्रमाचे आयोजक शिवप्रसाद कोरे, हरिभक्त परायण अंभोरे महाराज, संदीपभाई शर्मा महाराज, गो कथाकार सागर महाराज, शिवसांब कोरे, ओंकार कोरे, मारुती कोरे तसेच किरण बिच्चेवार उपस्थित होते.

# अवकाळीच्या धास्तीने गहू काढणीची लगबग सुरू; हवामान खात्याचा पाऊस, वारा व गारांचा इशारा

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** शासकीय हवामान वेधशाळा व हवामान अभ्यासक पंजाब डख यांच्या अंदाजानुसार मराठवाड्यात अवकाळी पाऊस, वारा व गारांचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा रब्बी गहू, ज्वारी व हरभरा काढणीला वेग आला असून अनेक शेतकरी अर्धवट हिरवा असलेला गहू कापून झाकून ठेवत आहेत. तर काहीजण तसाच मळणी यंत्रातून काढून घेत असल्याची लगबग सर्वत्र सोनपेठ तालुक्यात दिसून येत आहे.

गतवर्षीच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे खरीपाची पिके जमीन उध्वस्त झाली. त्यानंतर सोनपेठ तालुक्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामामध्ये हरभरा ज्वारी व गहू या पिकाची मोठ्या प्रमाणात पेरणी केली. लवकर पेरणी केलेले शेतकऱ्यांचा हरभरा व ज्वारीचे पीक काढून झाले असले तरी उशिराने पेरणी झालेल्या शेतकऱ्यांचा गहू, ज्वारी व हरभरा अजूनही शेतावरच उभा आहे. गेली आठवडाभरापासून हवामान अभ्यासक पंजाब व शासकीय हवामान वेध शाळेकडून दिनांक १७ ते २२ मार्च दरम्यान महाराष्ट्रासह मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस, सोसाट्याचा वारा येणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. तसेच काही ठिकाणी गारा पडणार असल्याचेही भाकीत करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीमाल काढण्याची एकच लगबग सुरू केली आहे. पावसाच्या धास्तीने ज्वारी हरभरा व गहू काढून झाकून ठेवण्यासाठी शेतकरी धडपडत असताना दिसून येत आहेत, तर काही ठिकाणी ज्वारी गहू व हरभरा या पिकांची



काढणी करून त्याची मळणी करण्यासाठी धावपळ करताना दिसत आहेत. अशातच अनेकांना वेळेत मळणी यंत्र व मजूर मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे.

अवकाळीच्या धास्तीने मळणीचे भाव वाढले अवकाळी पाऊस येणार असल्याने, हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेऊ नये यासाठी जो तो शेतकरी धडपडताना दिसत आहे. यावेळी काढलेल्या पिकांची मळणी करण्यासाठी मळणी यंत्रासाठी धावाधाव सुरू असून मळणी यंत्र चालकांनी आपले भाव वाढविले आहेत. एक कट्टा गहू काढण्यासाठी १०० ते १५० रुपये, ज्वारी साठी १०० ते १५० रुपये तर हरभरा मळणी साठी १५० रुपये दराने पैसे घेतले जात आहेत. एवढे पैसे देऊनही वेळेत मळणी यंत्र मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची मळणी यंत्राच्या शोधार्थ धावपळ सुरू आहे.

मजुरांचेही भाव वाढले रब्बीचे ज्वारी, गहू, हरभरा पीक काढण्यासाठी मजुरांची टंचाई भासत असून तालुक्यातील अनेक मजूर ऊस तोडणीसाठी इतरत्र साखर कारखान्याकडे गेलेले आहेत. ऊस तोडणीच्या टोळ्या गावाकडे परतल्या नसल्यामुळे ठिकठिकाणी मजुरांची टंचाई भासत आहे. अशातच गहू काढण्यासाठी प्रति एक्कर २ ते ३ कट्टे (६० किलो प्रती कट्टा),एक एक्कर ज्वारी काढण्यासाठी दोन ते आडीच कट्टा ज्वारी, एक एक्कर हारभरा काढणीसाठी ४००० रुपये याप्रमाणे मजुरी द्यावी लागत आहे. एवढे देऊनही वेळेत मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे. अवकाळी पाऊस येणार आहे या धास्तीने शेतमजुरांचे व मळणी यंत्र चालकांचे भाव दीडपट ते दुप्पट वाढले आहेत. तालुक्यातील कमी शेत जमीन असलेले लहान शेतकरी हे स्वतः घरच्या घरी पीक काढण्यासाठी शेतावर राबताना दिसत आहेत. तर जास्त शेती असलेल्या मोठ्या बागायतदार शेतकऱ्यांना मात्र मजूर वेळेत मिळत नसल्यामुळे मोठी कसरत करावी लागत आहे. उत्पादन काढण्यासाठी आजपर्यंत केलेला खर्च व बाजारातील मिळणारा शेतमालाचा भाव पाहता शेतकऱ्यांचे जमा-खर्चाचे गणित जुळणे कठीण झाले आहे.

### मराठवाडा हायस्कूलचा ठसा; सई चिटणीस हिला रौप्यपदक

**परभणी,/प्रतिनिधी-** मुंबई येथे १० मार्च रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत परभणीच्या मराठवाडा हायस्कूलने उल्लेखनीय कामगिरी करत आपला ठसा उमटवला. इयत्ता आठवी 'ब' वर्गातील कु. सई आशिष चिटणीस हिने उत्कृष्ट अभिनय सादर करत वैयक्तिक मुली गटात रौप्य पदक पटकावले.



या स्पर्धेत राज्यभरातून एकूण ४२ नाटकांचे सादरीकरण करण्यात आले होते. त्यामध्ये मराठवाडा हायस्कूलने सादर केलेल्या 'मोतीचूर' या नाटकाने प्रभावी सादरीकरण करत तृतीय क्रमांक मिळवला. या यशाबरोबरच संघाला ८० हजार रुपयांचे रोख पारितोषिकही मिळाले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेचा लौकिक राज्यस्तरावर अधिक उंचावला आहे. या नाटकात कु. सई चिटणीस, सर्वेश चिटणीस, स्वरा कुलकर्णी, साईराज गायकवाड आणि शौर्य गायकवाड यांनी आपल्या भूमिका प्रभावीपणे साकारत प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या अभिनयाचे परीक्षकांनीही कौतुक केले. कु. सई चिटणीस हिने साकारलेली भूमिका विशेष गाजली आणि तिच्या दमदार अभिनयामुळे तिला वैयक्तिक गटात रौप्य पदक प्राप्त झाले.

या उल्लेखनीय यशाबद्दल कु. सई चिटणीस व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक करण्यात आले. नूतन विद्या समितीचे अध्यक्ष विजय जोशी, उपाध्यक्ष अनिल अष्टूरकर, उपाध्यक्ष दिलीप कुलकर्णी, सचिव संतोष धारासुरकर, सहसचिव व मुख्याध्यापक अनंत पांडे, कोषाध्यक्ष श्रीनिवास मुंदडा, संचालक वेंकटेश तोरंबेकर, वर्गशिक्षिका सौ. विद्या सोनुने आणि सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी सई चिटणीस हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## तहसील कार्यालयातूनच जप्त ट्रॉलीची चोरी; प्रशासनाच्या सुरक्षेवर झाले मोठे प्रश्नचिन्ह?

**सेलू,/प्रतिनिधी-** तहसील कार्यालयातूनच जप्त ट्रॉलीची चोरी प्रशासनाच्या सुरक्षेवर प्रश्न चिन्ह समोर उभे टाकण्यात आले आहे.

सेलू तहसील प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा पर्दाफाश करणारी धक्कादायक घटना सेलू येथे उघडकीस आली आहे. थेट तहसील कार्यालयाच्या आवारातून महसूल विभागाने जप्त केलेली ट्रॅक्टर ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याने सरकारी यंत्रणेच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणी मोरेगाव येथील तलाठी राधिका गंगाधरराव गरुड यांच्या फिर्यादीवरून सेलू पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी महसूल विभागाने विनाक्रमांकाची लाल रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली जप्त करून ती तहसील कार्यालयाच्या आवारात ठेवली होती. ९ मार्च रोजी सायंकाळी सहाय्यक महसूल अधिकारी



राऊत यांनी जप्त वाहनांची पाहणी केली असता सदर ट्रॉली जागेवर असल्याचे दिसून आले. मात्र १० मार्च रोजी सकाळी ११ वाजता पुन्हा पाहणी केली असता ही ट्रॉली रहस्यमयरीत्या गायब झाल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे सदर ट्रॉली सोडण्याचा कोणताही अधिकृत आदेश तहसील कार्यालयाकडून देण्यात आलेला नसताना ती अचानक गायब झाल्याने प्रशासनाच्या बेपर्वाईचा मुद्दा पुढे आला आहे. सुमारे ७० हजार रुपये किंमतीची ही ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

सरकारी कार्यालयाच्या आवारातूनच जप्त माल चोरीला जाणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात असून प्रशासनाच्या सुरक्षा व्यवस्थेचा फज्जा उडाल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच तहसील कार्यालयात वाहन तोडफोडीची घटना घडली होती. त्या घटनेची धूळ खाली बसण्याआधीच आता जप्त ट्रॉलीच चोरीला गेल्याने या प्रकारात आतील संगनमत तर नाही ना, असा संशयही व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून चोरट्यांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. तसेच या प्रकारामागे कोणाचा सहभाग आहे का, याची सखोल चौकशी होणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## पाथरी येथील रोजगार मेळाव्यास उमेदवारांचा उस्फूर्त प्रतिसाद

**परभणी ,/प्रतिनिधी:** परभणी जिल्हयातील गरजू सुशिक्षित बेरोजगारांना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित शांताबाई नखाते विद्यालय, पाथरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७/०३/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता शांताबाई नखाते विद्यालय, शिवाजी नगर, पाथरी येथे ''पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' आयोजीत करण्यात आलेला होता. जिल्हयातील दहावी, बारावी, आयटीआय, डीप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणीक पात्रता धारक उमेदवारांसाठी ट्रेनी ऑपरेटर, क्षेत्र अधिकारी (), क्षेत्र अधिकारी (), विमा सल्लागार, विमा सखी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी () इत्यादी २०० पदांसाठी मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. या मेळाव्यास १३० उमेदवार उपस्थितीत होते त्यापैकी ७४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री अनिल नखाते, वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी, प्रमुख मार्गदर्शक श्री प्र.सो. खंदारे, सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता परभणी, प्रमुख पाहुणे श्री आर.एम. टेंगसे प्रशासकीय अधिकारी वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी, व श्री सि.एस.उस्तुरगे शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था पाथरी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राध्यापक श्री किशन डहाळे सर यांनी केले. रोजगार मेळावा यशस्वी होण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील श्री प्रविण रुद्रकंठवार श्री राहूल गजभारे, श्री सचिन चव्हाण, श्री राहूल काळे, श्री करिमोदीन अन्सारी यांनी सहकार्य केले.



## युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगाल विधानसभेत प्रचार



**परभणी,/प्रतिनिधी:** भाजप युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर (देवा) शिंदे पश्चिम बंगाल विधानसभेत प्रवासी कार्यकर्ता प्रचारक म्हणून प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी मराठवाडा विभागातून निवड केली आहे.हि निवड केल्याबद्दल महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण,राज्य मंत्री मेघना दिदी बोर्डीकर प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे,प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक,जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे मराठवाडा समन्वयक अरुण पाठक, दत्तप्रसाद जाधव यांचे देवा शिंदे यांनी आभार मानले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,आता होत असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील युवा मोर्चाचे पदाधिकारी प्रवासी कार्यकर्ता म्हणून प्रचार करणार आहेत. यामध्ये प्रभाकर (देवा) शिंदे यांची प्रवासी कार्यकर्ता प्रचारक म्हणून त्यांनी निवड केली आहे. या निवडणुकीत युवा मोर्चाचे पदाधिकारी राष्ट्रीय नेत्यांसोबत पश्चिम बंगाल राज्यातील विधानसभा निवडणुकीत प्रचार करणार आहेत.या निवडीबद्दल सर्व स्तरातून युवा नेत्याचे अभिनंदन केले जात आहे.

## गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्ध लढा देण्यासाठी सेलूत तालुका शीघ्र पथकाची बैठक

**सेलू,/प्रतिनिधी:** गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्ध लढा देण्यासाठी सेलूत तालुका शीघ्र पथकाची बैठक घेण्यात आली होती.

तहसील कार्यालय सेलू येथे दि. १० मार्च रोजी एच.पी.व्ही. (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेबाबत तहसीलदार श्री. शिवाजी मगर यांच्या अध्यक्षतेखाली तालुका शीघ्र पथकाची बैठक संपन्न झाली. या बैठकीस गटविकास अधिकारी उदय जाधव, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय हरबडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. के. पी. चौधरी, एकात्मिक बालविकास विभागाचे प्रकल्प अधिकारी बाबासाहेब खरात तसेच शिक्षण विभागातून अंभोरे मॅडम उपस्थित होत्या. यावेळी डॉ. संजय हरबडे यांनी एच.पी.व्ही. लसीकरणाबाबत सविस्तर माहिती दिली. भारतात गर्भाशय पिशवीच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण चिंताजनक असून दर एक लाख महिलांमागे सुमारे ११.६ महिलांना हा कर्करोग होतो, तर ५.१ महिलांचा मृत्यू होतो. सन २०२२ मध्ये देशात ७९,१०३ नवीन रुग्ण आढळले असून त्यापैकी ३४,८०५ महिलांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले. ह्युमन पॅपिलोमा विषाणूमुळे हा कर्करोग होतो. या आजाराच्या प्रतिबंधासाठी एच.पी.व्ही. लस विकसित करण्यात आली असून पाश्चात्य देशांमध्ये ही लस नियमितपणे दिली जाते. दि. ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राज्यात या लसीकरण मोहिमेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्यमंत्री प्रकाश आंबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. २०३० पर्यंत गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे निर्मूलन करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी १४ ते १५ वर्षे वयोगटातील ९० टक्के मुलींना लसीकरण, ३५ व ४५ वर्ष वयोगटातील ७० टक्के महिलांची तपासणी तसेच निदान झालेल्या ९० टक्के महिलांवर उपचार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सेलू तालुक्यात १४ वर्ष पूर्ण व १५ वर्षांच्या आत असलेल्या मुलींना उपजिल्हा रुग्णालय सेलू तसेच ग्रामीण भागासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र वालूर व देऊळगाव गात येथे ही लस दिली जाणार आहे. प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी ही लस देणार असून त्याची ऑनलाइन नोंद करण्यात येणार आहे. तसेच लसीकरणाचे प्रमाणपत्र त्वरित दिले जाणार आहे. ही लस डाव्या दंडाच्या स्नायूमध्ये ०.५ मिली इतकी देण्यात येते.

'गार्डासिल' नावाची ही लस अत्यंत प्रभावी असल्याचेही सांगण्यात आले. तालुक्यातील शाळेत शिकणाऱ्या तसेच शाळाबाह्य १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींनी जवळच्या शासकीय रुग्णालयात ही लस घ्यावी आणि पालकांनी यासाठी सहकार्य व संमती द्यावी, असे आवाहन तहसीलदार शिवाजी मगर यांनी केले.

## अग्रलेख...

# बहुरूपी, बुभुक्षित भोंदू!

कोणत्याही एखाद्या उत्पादनास किंवा सेवेस मोठी मागणी असल्याचे सिद्ध होऊ लागते तेव्हा मागणीनुसार पुरवठा करणाऱ्यांची गर्दीही वाढू लागते, आणि मागणी वाढू लागली की त्या उत्पादन किंवा सेवेची किंमतही वाढत जाते, हा अर्थशास्त्राचा सामान्य नियम अध्यात्माच्या बाजाराला तंतोतंत लागू ठरताना दिसत आहे. असे झाले की वस्तू वा सेवांचा दर्जा खालावतो, भेसळीसारखे प्रकार वाढतात आणि काळाबाजारासही ऊत येतो. अलिकडे असंख्य संकटे आणि समस्यांचा सार्वत्रिक सुळसुळाट झालेला असताना व त्यापासून संरक्षण करण्याची हमी देणाऱ्यांचे हात मात्र तोकडे ठरत असताना, समाज किंवा व्यक्ती संरक्षणाच्या अपेक्षेने कोठे तरी नजरा खिळवून बसलेली असते. ज्यांचे हात वरपर्यंत वगैरे पोहोचलेले असतात, खिसे कायम खुळखुळत असतात, अशांना असे संरक्षण मिळविणे फारसे अवघड होत नाही. पण असा वर्ग फारच थोडा असून ज्यांची तशी क्षमता नाही, त्यांना मात्र समस्यामुक्ती आणि संकटांपासून संरक्षणासाठी देवावर किंवा नियतीवर अवलंबून राहणे भाग पडते. कोणत्याही समस्येमुळे ईश्वराने किंवा दैवाने मार्ग काढून द्यावा अशी हतबल भावना जेव्हा सामूहिकरीत्या वाढीस लागते, तेव्हा अशा हतबलांची गर्दी श्रद्धेच्या बाजारात सुरक्षिततेचा शोध घेऊ लागते आणि या बाजारातील सेवा किंवा उत्पादकांची मागणी वाढू लागली की पुरवठादारांची चंगळ सुरू होते. बाजाराचा हा नियम श्रद्धेच्या बाजारातही लागू ठरू लागला, तेव्हापासून अनेकांनी या बाजारात आपली आपली दुकाने थाटली. गेल्या काही दशकांपासून या बाजारात कायम तेजीच दिसत असून येथील दुकानदारांची भरभराट होत असल्याचे दिसते. कारण, या बाजारात मानसिक गरजांची पूर्तता होते अशी भावना असलेल्या ग्राहकांकडून दुकानदारांच्या दारी रीघ लागलेलीच असते. त्यामुळे दिवसागणिक कोठल्या ना कोठल्या गावात, शहरात किंवा देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात एखादा बाजारू दुकानदार आपले दुकान सुरू करतो, आपल्या पद्धतशीर यंत्रणेद्वारे लाखो रुपये खर्च करून जोरदार जाहिरातबाजी करतो आणि असे नवे दुकान सुरू झाल्याचे कळताच, तिकडे गरजू ग्राहकांची रीघ लागते. या व्यवसायाची साखळी मोठी गूढ असते. तो धंदा बघता बघता फोफावतो आणि मानसिक सुखाच्या भ्रामक कल्पनांत गुरफटलेला ग्राहकही त्या दुकानाची जाहिरात करू लागतो. अशा रीतीने अध्यात्म, ज्योतिष, भविष्यज्ञान, संकटमुक्ती, प्रमेविवाह, प्रतिष्ठा, राजकीय यश, संपत्तीच्या समस्या, कौटुंबिक कलह, अपत्यप्राप्ती अशा असंख्य समस्यांनी ग्रासलेले ग्राहक या दुकानदारांकडे रांगा लावतात. या बाजारातील प्रत्येक दुकानदाराने आपल्या धंद्याला साजेसा अवतार धारण केलेला असतो. यासाठी फार मोठी भांडवली गुंतवणूकही केलेली असते. प्रथमदर्शनी संकटमोचक भासावा असा एक मुखवटा त्यांना धारण करावा लागतो. त्यांच्या चेहऱ्यावर एक निरागस हास्य विलसत असते. अंगी ईश्वरी किंवा अतिमानवी शक्ती असल्याची जाणीव करून देणारा बाह्यांगी साधेपणा त्यांना धारण करावा लागतो आणि वैराग्याची किंवा विरक्तीची चिन्हे असलेली वेषभूषा परिधान करून आध्यात्मिक तेजाची झळाळी असलेल्या मुखवट्याआड मूळचा चेहरा बेमालूम झाकून ठेवावा लागतो. दैवी शक्तीचा वास असल्याचा भास व्हावा यासाठी मठ किंवा आश्रम नावाच्या या दुकानात धूप, अगरबत्त्या, चंदनादी पूजावस्तूंची गर्दी ठेवावी लागते आणि भक्तगण जमा होऊ लागले की दिशाभूल करण्यासाठी एखाद्या चमत्काराची जादूही त्यांनी आत्मसात करून ठेवावी लागते.

असेच एक दुकान महाराष्ट्राच्या अहिल्यानगर आणि नाशिक परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून जोमाने धंदा करत होते. त्याच्या नादी लागलेल्या ग्राहकांमध्ये सर्वच प्रकारचे भक्त असल्याने, त्याच्या धंद्याला संरक्षणाचे कवचही लाभल्याची चर्चा होती. राजकीय नेते, मंत्री, प्रतिष्ठित उद्योजक, सामान्य समस्याग्रस्त अशा सर्वांना या भक्ताने समस्यामुक्तीचा भविष्यवेधी मार्ग दाखविणारे दुकान सुरू केले आणि फसवणुकीच्या एका प्रकरणात त्याचा मुखवटा टराटरा फाटला. भविष्यवेध घेऊन समस्यामुक्तीचा मार्ग दाखविण्याचा दावा करणारा कॅप्टन खरात नावाचा हा भोंदू म्हणजे केवळ एका व्यक्तीच्या विकृत गुन्हेगारी प्रवृत्तीचे उदाहरण नाही; तर ते आपल्या समाजाच्या मानसिकतेतील खोलवर दडलेल्या अंधश्रद्धा, भीती आणि आंधळ्या श्रद्धेच्या जाळ्याचे भयावह चित्र उलगडणारे आणखी एक उदाहरण आहे. स्वतःला आध्यात्मिक मार्गदर्शक, ज्योतिषी आणि 'दैवी शक्तीचा धनी' म्हणविणाऱ्या या भोंदू दुकानदाराने असाच, आध्यात्मिक मुखवटा चढविला आणि कोणत्या ना कोणत्या समस्यांच्या भयाने पछाडलेल्या महिलांना मुक्तीचा विश्वास देत त्यांच्या शारीरिक आणि मानसिक शोषणाची आपली विकृती जोपासत राहिला. कॅप्टन खरात प्रकरण ही बाब जितकी धक्कादायक आहे, तितकीच सामाजिक मानसिकतेच्या बदलांचा अंतर्मुखपणे विचार करावयास भाग पाडणारी आहे. उपाय, विधी, कुंडली दोष किंवा दैवी संकट यांसारख्या संकल्पनांच्या आडून लोकांना भयभीत करणे आणि त्यातून स्वतःसाठी सत्ता व नियंत्रण निर्माण करणे ही या भोंदूची या बाजारातील युक्ती नवीन नाही. मात्र, या प्रकरणात ती अत्यंत योजनाबद्ध आणि क्रूर स्वरूपात वापरली गेल्याचे दिसते. गुंगीची औषधे देऊन अत्याचार करणे आणि त्याचे चित्रीकरण करून त्यांची पिळवणूक वा शोषण करणे ही केवळ वैयक्तिक गुन्हेगारी नाही; तर ती संघटित शोषण व्यवस्थेची लक्षणे आहेत. यामागील सामाजिक पृष्ठभूमीही दुर्लक्षित करता येणार नाही. आधुनिक शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीनंतरही समाजातील मोठा वर्ग अजूनही अंधश्रद्धेच्या पाशात अडकलेला आहे. संकटाच्या क्षणी तर्कबुद्धीपेक्षा 'आशीर्वाद देऊन संरक्षणाची हमी देणारा कोणीतरी वरचा हात' शोधण्याची मानसिकता अजूनही प्रबळ आहे. अशा वेळी 'कॅप्टन खरात'सारखे भोंदू स्वतःला देवदूत किंवा मार्गदर्शक म्हणून उभे करतात आणि लोकांच्या भीतीचा फायदा घेतात. या प्रकरणात राजकीय आणि प्रभावशाली व्यक्तींशी असलेले संभाव्य संबंध ही बाब अधिक गंभीर म्हणावी लागेल. अशा विकृत प्रवृत्तींना किंवा व्यक्तींना सामाजिक किंवा राजकीय संरक्षण मिळत असेल, तर न्यायव्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी केवळ गुन्हेगाराला शिक्षा देण्यापुरती मर्यादित राहू नये; तर त्या मागील साखळी, संबंध आणि संभाव्य संगनमत उघड करणेही तितकेच आवश्यक आहे. महिला सुरक्षेच्या दृष्टीनेही हे प्रकरण म्हणजे धोक्याचा एक गंभीर इशारा आहे. घर, कार्यालय किंवा सार्वजनिक ठिकाणांबरोबरच 'आध्यात्मिक' किंवा 'धार्मिक' जागाही सुरक्षित आहेत, असा समज या घटनेने खोटा ठरवला आहे. महिलांच्या विश्वासाचा गैरवापर करून केलेले शोषण हे समाजाच्या नैतिक अध:पतनाचे द्योतक आहे. त्यामुळे महिलांनी अशा तथाकथित गुरू, बाबांबाबत अधिक सजग राहणे आणि कोणत्याही संशयास्पद वर्तनाची त्वरित तक्रार करणे आवश्यक आहे. गेल्या अनेक दशकांत वारंवार उघडकीस येत असलेल्या अशा घटनांतून समाज जागृतीचे आणि श्रद्धा व अंधश्रद्धा यांतील धूसर सीमरेषा दाखवून देण्याचे महत्त्वही पुन्हा अधोरेखित होते. महाराष्ट्राने यापूर्वीही कायदे किंवा मोहिमांतून समाजजागृती केली आहे; परंतु अजूनही ती अपुरी आहे. शिक्षण व्यवस्थेत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे, माध्यमांनी जबाबदारीने अशा प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि प्रशासनाने कठोर कारवाई करणे, या तिन्ही गोष्टी एकत्रितपणे घडल्याशिवाय बदल संभवत नाही. कॅप्टन खरात प्रकरणातून पुन्हा तोच जुना मूलभूत प्रश्न पुढे आला आहे. आपण खरोखरच पुरोगामी, प्रगतिशील, आधुनिक, विवेकनिष्ठ समाज आहोत, की संकटाच्या वेळी अजूनही आपण अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन अंधश्रद्धांच्या बाजारपेठांतील भोंदू बहुरुप्यांची भरभराट करतो, या प्रश्नाचे उत्तर शोधणे ही केवळ सरकार किंवा न्यायव्यवस्थेची जबाबदारी नाही. विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांचा स्वीकार केल्याशिवाय अशा घटनांची पुनरावृत्ती थांबणार नाही हे स्पष्ट असल्याने, ही समाजाची जबाबदारी ठरते. अन्यथा 'कॅप्टन खरात' ही केवळ एक व्यक्ती न राहता एक प्रवृत्ती बनत जाईल आणि तीच सर्वांत मोठी धोक्याची घंटा ठरेल.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# दोन मालमत्ता विकून एक घर घेतल्यास भांडवली नफा कर कसा वाचवता येतो?

आजच्या काळात अनेक व्यक्तींकडे एकापेक्षा जास्त स्थावर मालमत्ता असणे, ही सामान्य बाब झाली आहे. नोकरी, व्यवसाय किंवा गुंतवणुकीच्या उद्देशाने लोक वेगवेगळ्या काळात फ्लॅट, घर किंवा प्लॉट खरेदी करतात. काही वर्षांनंतर परिस्थिती बदलते आणि अनेक जण दोन लहान मालमत्ता विकून एक मोठे किंवा चांगल्या ठिकाणचे घर खरेदी करण्याचा निर्णय घेतात. अशा व्यवहारांमध्ये सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे भांडवली नफा कर. योग्य नियोजन केले नाही, तर लाखो रुपयांचा कर भरावा लागू शकतो. मात्र, आयकर कायद्यातील काही तरतुदींचा योग्य वापर केल्यास हा कर पूर्णपणे किंवा मोठ्या प्रमाणात वाचवता येतो. हा लेख अशाच व्यावहारिक परिस्थितींचे सविस्तर स्पष्टीकरण देतो.

**भांडवली नफा कर कसा लागू होतो?** : जेव्हा एखादी व्यक्ती स्थावर मालमत्ता (फ्लॅट, घर, प्लॉट किंवा जमीन) विकते आणि त्या विक्रीतून नफा मिळतो, तेव्हा त्या नफ्यावर आयकर कायद्यानुसार कर आकारला जातो. जर मालमत्ता २४ महिन्यांपेक्षा जास्त काळ धरून ठेवली असेल, तर त्या नफ्यावर दीर्घकालीन भांडवली नफा (एलटीसीजी) लागू होतो.

२० टक्के की १२.५ टक्के - योग्य पर्याय कोणता? हे निवडण्याचा पर्याय फक्त ज्यांनी संपत्ती २३/०७/२०२४ च्या आधी संपादित केली आहे, त्यांच्यासाठीच उपलब्ध आहे. सध्या एलटीसीजीसाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत

**१.२० टक्के कर (अनुक्रमणिका सह)**

• खरेदी किंमत इंडेक्सेशनने वाढवली जाते, • महागाईचा फायदा मिळतो, • दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी फायदेशीर

**२. १२.५ टक्के कर (अनुक्रमणिका शिवाय)** • नवीन पर्याय • सोपी गणना, • काही प्रकरणांमध्ये कमी कर लागू होऊ शकतो

करदात्याने व्यवहारानुसार योग्य पर्याय निवडणे आवश्यक आहे.

**कलम ५४ - निवासी घर विकल्यास सवलत** : जर एखाद्या व्यक्तीने निवासी घर विकून दुसरे निवासी घर खरेदी केले, तर कलम ५४ अंतर्गत सवलत मिळते. **अटी** : • विकलेली मालमत्ता निवासी घर असावी, • नवीन मालमत्ता निवासी घर असावी

**खरेदी/बांधकाम कालावधी** : • विक्रीपूर्वी १ वर्ष, • विक्रीनंतर २ वर्षे • ३ वर्षांत बांधकाम

**कलम ५४एफ - प्लॉट किंवा जमीन विकल्यास सवलत** : जर प्लॉट किंवा जमीन विकून नवीन घर घेतले, तर कलम ५४ लागू होतो.

**अटी** : • विक्रीच्या दिवशी एकापेक्षा जास्त निवासी घर नसावे, • संपूर्ण विक्री किंमत गुंतवणे आवश्यक, • अंशतः गुंतवणूक केल्यास आनुपातिक सवलत

व्यावहारिक कर नियोजन - महत्त्वाच्या परिस्थिती

**परिस्थिती १** : दोन फ्लॅट विकून एक नवीन फ्लॅट

समजा : • फ्लॅट १ नफा : ३० लाख रुपये, • फ्लॅट २ नफा : २५ लाख रुपये. एकूण भांडवली नफा : ५५ लाख

जर ७० लाख किमतीचा नवीन फ्लॅट खरेदी केला, तर कलम ५४ अंतर्गत संपूर्ण ५५ लाख सवलत मिळू शकते.

**परिस्थिती २** : एक फ्लॅट आणि एक प्लॉट विकून एक घर खरेदी करणे

समजा : • फ्लॅट नफा : ३५ लाख - कलम ५४, • प्लॉट नफा : २५ लाख - कलम ५४. एकूण नफा : ६० लाख

**येथे सर्वांत महत्त्वाचा मुद्दा** : कलम ५४एफ साठी अट आहे की, विक्रीच्या दिवशी करदात्याकडे एकापेक्षा जास्त निवासी घर नसावे. म्हणून व्यवहाराचा क्रम अत्यंत महत्त्वाचा ठरतो. **योग्य पद्धत** : • प्रथम फ्लॅट विकणे, • त्यानंतर प्लॉट विकणे, • आणि मग नवीन घर खरेदी करणे

**योग्य नियोजन केल्यास** : • ३५ लाख (कलम ५४), • २५ लाख (कलम ५४ एफ) एकूण ६० लाख पूर्णतः करमुक्त होऊ शकतो.

चुकीचा क्रम ठेवल्यास कलम ५४ एफ सवलत नाकारली जाऊ शकते.

**परिस्थिती ३** : दोन मालमत्ता विकून नवीन घर बांधणे

**समजा** : • एकूण विक्री रक्कम : १.५० कोटी रुपये, • भांडवली नफा : ७० लाख रुपये

**जर** : प्लॉट खरेदी केला आणि ३ वर्षांच्या आत घर बांधले- कलम ५४/५४एफ अंतर्गत सवलत मिळू शकते

**भांडवली नफा खाते योजना (सीजीएएस) चे महत्त्व** : अनेक वेळा मालमत्ता विकली जाते, पण लगेच नवीन गुंतवणूक करता येत नाही.

**अशा वेळी** : • आयटीआर भरण्याच्या अंतिम तारखेपूर्वी सीजीएएस खात्यात रक्कम जमा करणे आवश्यक. अन्यथा कर सवलत मिळणार नाही.

**व्यवहार करताना होणाऱ्या सामान्य चुका**

• कलम ५४ आणि ५४ एफ मधील फरक न समजणे, • ५४ एफ पात्रता (एकापेक्षा जास्त घरांचा नियम), • दुर्लक्षित करणे, • व्यवहाराचा चुकीचा क्रम ठेवणे, • सीजीएएसमध्ये रक्कम जमा न करणे, • पूर्ण रक्कम गुंतवणूक न करणे. **निष्कर्ष** : दोन मालमत्ता विकून एक नवीन घर खरेदी करणे ही केवळ गुंतवणूक नसून, एक कर नियोजनाची संधी आहे.

**योग्य नियोजन केल्यास** : • कलम ५४, • कलम ५४एफ, • आणि २० टक्के विरुद्ध १२.५ टक्के कर पर्याय

सामान्य वाचकांसाठी एक गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे की, मालमत्ता खरेदी-विक्री ही केवळ गुंतवणूक किंवा गरज पूर्ण करण्याची प्रक्रिया नसून, ती एक महत्त्वाची कर नियोजनाची संधी देखील असते. अनेक वेळा योग्य माहितीच्या अभावामुळे किंवा घाईघाईत घेतलेल्या निर्णयांमुळे अनावश्यक भांडवली नफा कर भरावा लागतो. प्रत्यक्षात, आयकर कायद्यातील उपलब्ध तरतुदींचा योग्य आणि वेळेवर वापर केल्यास मोठ्या प्रमाणात कर बचत करता येते. त्यामुळे कोणतीही मालमत्ता विकण्यापूर्वी व्यवहाराचा क्रम, गुंतवणुकीचा कालावधी आणि संबंधित सवलतींची अटी समजून घेणे आवश्यक आहे. योग्य सल्ला आणि नियोजन केल्यास आपण केवळ चांगली मालमत्ता मिळवू शकत नाही, तर आपल्या आर्थिक फायद्याचाही जास्तीत जास्त लाभ घेऊ शकतो.

(९०९६३३२३५३, कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार)

## वेध

**रेवती जोशी–अंधारे**

# मानवजात अधिक रानटी होतेय का?

सध्याचे जग एका विचित्र वळणावर उभे आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने अभूतपूर्व प्रगती साधली, मानवाने चंद्र-मंगळ गाठला, कृत्रिम बुद्धिमत्ता दैनंदिन आयुष्याचा भाग झाली; पण अशा नव्या आकांक्षांच्या, स्वप्नांच्या काळात पृथ्वीवर संघर्षांचे, युद्धांचे सावट अधिक गडद होताना दिसते. एका बाजूला विकासाची चकाकी, तर दुसऱ्या बाजूला विनाशाची छाया अशा संघर्षात मानवजात अडकलेली आहे. सध्या जगात अनेक ठिकाणी संघर्ष पेटलेले आहेत. इराण-इस्रायल-अमेरिका हा संघर्ष ताजा आहे. त्याने सारे जग वेठीस धरले आहे. युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्धाने दोन वर्षांहून अधिक काळ जगात अस्थिरता निर्माण केली आहे. हे सारे संघर्ष भूभागांसाठी तर आहेतच, शिवाय सामरिक वर्चस्व, राजकीय वर्चस्व आणि जागतिक सत्ता-संतुलनाचा प्रश्न याच्याशी संबंधित आहे. गाझा पट्टी आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाने मानवी संकटाची परिसीमा गाठली आहे. हजारो निरपराध नागरिकांचे जीव जात आहेत आणि युद्धाचे नियमही पायदळी तुडवले जात आहेत. सुदानमध्ये अंतर्गत सत्तासंघर्षामुळे गृहयुद्ध सुरू आहे. म्यानमारमध्ये सैन्य आणि लोकशाही समर्थक यांच्यातील संघर्ष अजूनही शांत झालेला नाही. येमेनमध्ये अनेक वर्षांपासून सुरू असलेले युद्ध हे मानवांसाठी आपत्तीचे मोठे केंद्र बनले आहे. सीरियात दशकभर चाललेल्या युद्धाने संपूर्ण पिढी उद्ध्वस्त केली आहे. हे सगळे पाहता, संघर्षांची संख्या मोजणेही अवघड झाले आहे. संघर्षांचे स्वरूपही बदलले आहे.

पूर्वीची युद्धे राष्ट्रांमध्ये थेट होत असत; आज युद्धे बहुआयामी झाली आहेत. आर्थिक निर्बंध, माहिती युद्ध (इन्फर्मेशन वॉरफेअर), सायबर हल्ले आणि दहशतवादी कारवाया ही सगळी आधुनिक युद्धाची रूपे आहेत. शत्रू सीमारेषेच्या पल्याड आहे तसा तो इंटरनेटच्या जाळ्यातही आहे. त्यामुळे युद्ध अधिक गुंतागुंतीचे, अधिक व्यापक झाले आहे. या पृष्ठभूमीवर सर्वांत मोठा प्रश्न उभा राहतो तो असा की, प्रगती-प्रगती म्हणत असताना मानवजातीने नेमके काय साध्य केले? आजही जगात कोट्यवधी लोक भुकेने त्रस्त आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, अन्नाची



कमतरता आणि कुपोषण ही गंभीर जागतिक समस्या आहे. शिक्षणाच्या क्षेत्रातही मोठी तफावत आहे. अनेक देशांमध्ये मुलांना प्राथमिक शिक्षणही मिळत नाही. म्हणजेच, एकीकडे शस्त्रास्त्रांवर अब्जावधी डॉलर्स खर्च होत आहेत, तर दुसरीकडे मूलभूत गरजांसाठी निधी अपुरा पडतो. युद्धांमुळे निर्माण झालेल्या शस्त्रास्त्रांच्या नव्या स्पर्धेने या संकटात भर घातली आहे. इराणकडून या युद्धात जी शस्त्रास्त्रे दाखविली जात आहेत, त्यावरून त्या देशाने किती खर्च केला असेल, याची कल्पना येते. अण्वस्त्रांची संख्या, अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, ड्रोन तंत्रज्ञान या सर्व गोष्टींवर प्रचंड खर्च केला जातो. हा पैसा जर शिक्षण, आरोग्य आणि गरिबी निर्मूलनासाठी वापरला गेला असता, तर जगाचे चित्र वेगळे असते. पण वास्तव वेगळे आहे. भीती आणि अविश्वास यांच्या आधारेच जगाचे राजकारण चालते. यामुळेच एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो आणि तो असा की- जग अधिक रानटी होत आहे का? की हीच प्रगतीची किंमत आहे? वस्तुस्थिती अशी आहे की मानवाचे बाह्य जीवन अधिक आधुनिक झाले असले, तरी अंतर्मनातील संघर्ष संपलेले नाहीत. लोभ, सत्तेची लालसा, वर्चस्वाची इच्छा या मानवी प्रवृत्ती अजूनही तशाच आहेत. त्यामुळे तंत्रज्ञान बदलले, पण मनुष्याचा मूलभूत स्वभाव फारसा बदललेला नाही. ही स्थिती बदलायची असेल तर जागतिक पातळीवर संवाद आणि कूटनीती (डिप्लोमसी) यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. देशांनी आपले मतभेद चर्चेने सोडवण्याची तयारी ठेवली पाहिजे. दुसरे म्हणजे, आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका अधिक प्रभावी होणे गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांनी केवळ निवेदने देण्यापेक्षा ठोस कारवाई करण्याची गरज आहे. मानवाचेच निर्णय मानवाचे भविष्य ठरवतील. आपण विनाशाचा मार्ग निवडला, तर सभ्यतेचा व प्रगतीचा मुखवटा टिकणार नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

९८५०३३९२४०

## प्रासंगिक

**प्रमोद डोरले**

# भारतीय संस्कृतीचा शाश्वत आधारस्तंभ

रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये भारतीय संस्कृतीचे दोन शाश्वत आधारस्तंभ आहेत. सांस्कृतिक जीवनाच्या वाटचालीत पडझडीत, विविध आक्रमण कालातील अंधारलेल्या युगात, सत्याचा, धर्माचा, जीवन मर्यादांचा दिव्य प्रकाश दाखविणारे दीपस्तंभ म्हणून ही दोन महाकाव्ये आधुनिक काळातही वैचारिक, तात्त्विक ज्ञानात्मक मार्गदर्शन करण्याची क्षमता ठेवू शकतात. या दृष्टीने ही दोन महाकाव्ये अक्षर वाङ्मय या कसोटीला पूर्ण न्याय देणारी अशीच आहे. व्यासोच्छिष्ट जगत सर्वम् ही उक्ती आजही सार्थ ठरते आहे. रामायण आणि महाभारत या ग्रंथातील तत्त्वज्ञानाने भारतीय संस्कृतीला नीतिमूल्यांचे, जीवनाच्या शाश्वत, चिरंतन मूल्यांचे अधिष्ठान मिळाले आहे. त्यांतील महन्मंगल आणि उदात्त चारित्र्याच्या गुण संस्कारांमुळे येथील समाजमनाचे पोषण झाले. विकसन झाले. आसेतुहिमाचल पसरलेल्या या देशात सांस्कृतिक एकता निर्माण होऊ शकली. त्याच एकात्मतेच्या जोरावर अनेक भीषण आक्रमणाचे आघात ही संस्कृती पचवू शकली हे जगाने अनुभवलेले सत्य आहे

सूर्यवंशी इक्ष्वाकू कुळात जन्मलेले प्रभू श्रीरामचंद्र हे मर्यादा पुरुषोत्तम आहेत. महर्षी श्री वाल्मीकिंच्या दिव्य प्रतिभेतून साकार झालेले हे महन्मंगल चरित्र! व्यक्तिमत्त्व! मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सर्व भूमिकांचा परमोच्च उत्तुंग आदर्श म्हणजे प्रभु श्रीरामचंद्र! रामराज्याची निर्मिती करणारा आदर्श राजा, वडिलांनी दिलेल्या वचनपूर्तीसाठी सिंहासनावर पडणारे पाऊल दुसऱ्याच क्षणाला वनातील कंट-काकीर्ण मार्गावर टाकून रघुकुल रीत सदा चली आयी -- प्राण जाय पर वचन न जायी- हा रघुवंशाचा वारसा जोपासणारा आदर्श पुत्र, रावणाने सीतामाईला पळवून नेल्यानंतर व्याकुळतेने, हे सीते! हे सीते म्हणून आक्रोश करणारा, विरहाग्नीत पोळणारा आदर्श पती, सुग्रीवावरील अन्याय दूर करून त्याला योग्य तो न्याय मिळवून देणारा परम मित्र, युद्धात लक्ष्मणाला शक्तीचा आघातामुळे आलेल्या मूर्च्छावस्थेत भावुक होऊन विलाप करणारा ज्येष्ठ बंधू, कैकेयीने अन्याय केलेला असतानाही कौसल्येपेक्षाही तिला अधिक मान देणारा पुत्र, सामान्य वनवासी जीवन जगणाऱ्या गुहाला सन्मानाने मित्र म्हणून स्वीकार करणारा हितैषी, सर्वप्रकारच्या सामर्थ्याने सुसज्ज असलेल्या दानवी, मायावी सामर्थ्याने युक्त आणि प्रत्यक्ष देवांनाही पराजित करणाऱ्या असुर शक्तीचा सहजपणे पराभव करणारा वीराग्रणी नेता, रावणाचा वध झाल्यानंतर मरणान्तानि न वैराणि न मे कृतानिच- चा शत्रुभावना विरहिततेचा मानवधर्माचा मापदंड प्रस्थापित करणारा महामानव आणि अयोध्येला परत आल्याबरोबर आपली मातृभूमी म्हणून तिला वंदन करून 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गात अपि गरियसी' या श्रेष्ठतम राष्ट्रभक्तीचा आदर्श प्रस्थापित करणारा, पुण्यभूमी धर्मभूमी, देवभूमी भारतमातेचा सुपुत्र अशा अनेक विलोभनीय जीवनादर्शांनी विनटलेले असे हे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्री रामचंद्रांचे चरित्र!



महर्षी श्री वाल्मीकिंच्या दिव्य प्रतिभेतून प्रकट झालेल्या या रामायण महाकाव्याचा, त्यांतील विविध व्यक्तिजीवनाचा प्रभाव विश्वव्यापी आहे. विश्वसंचार करणाऱ्या आपल्या पूर्वजांनी ही रामकथा आपल्या सोबत जगाच्या विविध देशांमध्ये नेली. ते परत आलेत पण जीवनजगण्याचे तत्त्वज्ञान शिकविणारी रामकथा तेथे रुजली - विकसित झाली. त्यांच्याही जीवनाचे एक अविभाज्य अंग झाली. त्यांच्या साहित्यात, आचरणात, समाजजीवनात, राष्ट्रजीवनात, परंपरागत मूल्यांमध्ये विसावली, प्रतिबिंबित झाली. रामकथेच्या प्रभावाने प्रभावित झालेले देश म्हणून आज आपण चीन, तिबेट, सायबेरिया, कांबोडिया (कम्बुज) इंडोनेशिया, इत्यादी अनेक देशांची नावे घेऊ शकतो. रामन् रवागान् म्हणजे रामकथा, रामायण हे त्यांच्या जीवनाचे मार्गदर्शन करणारे पाथेय आहे. उदाहरण म्हणून आपण काही उल्लेख पाहू.

सायवेरियातील रामकथेत रिच्छेन पाल्साङ्गो या लेखकाने लोकांना उपदेश करताना असे म्हटले आहे की, ओलान-दुर आरव, बोलुग्रासन येरवे रवुमन् देमि, आलिया नागादुम्बा। ओख्यु आमुर सांगुरक्रुवा इंद्रेन, ओम्बागान दूर नेङ्ग उलु शिनुग्युयाई। ओल्ज गुसेल दुर नेङ्ग येसे शिनुग्सेन उ गेम इयरे। ओरिदुमान्गोस उन निगेन रवागान लंगा-दुर आलाग्दासान्'' म्हणजे -- जनतेच्या नेत्यांनी, महापुरुषांनी क्षुल्लक अशा आनंदात मग्न होऊ नये. विषयलंपट होऊ नये. लोभात पडल्याने व कामवश झाल्याने प्राचीन काळी राक्षसराज रावण लंकेत मारला गेला. इंडोनेशियातील रामायणाला काकाविन रामायण असे म्हणतात. त्यात श्रीराम भरताला उपदेश करताना म्हणतात- हे भरता! चारित्र्याचे रक्षण कर. राग द्वेष सोडून दे. ईर्ष्या आदि दोषांपासून मन आणि शरीर शून्य कर. अत्याधिक अहंकारापासून स्वतःला वाचव. निंदा करू नकोस. कुलीन घराण्याचा गर्व बाळगू नकोस. हे भरता हाच खरा धर्म आहे व हेच खरे सत्य आहे. श्रीरामाचा उपदेश ऐकून भरत अयोध्येला परत गेला आणि भक्तिपूर्वक राज्य रक्षणात व्यग्र राहिला 'भरत सिर तमोल-भक्ति मंराक्ष राज्य'. - अशी ही ब्रह्मांडाला व्यापून असणारी रामकथा संपूर्ण मानव समाजाच्या मनावर अधिराज्य गाजवणारी! मानवी जीवनाचा उद्देश काय? त्याला अर्थ केव्हा आणि कसा प्राप्त होतो. मानवी जीवनात पार पाडाव्या लागणाऱ्या या विविध भूमिकांमध्ये। कर्तव्यनिष्ठेच्या अंतिम मर्यादा कशा व कोणत्या? वरील सर्व मूलभूत प्रश्नांची, हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती यांना साक्षी ठेवून महर्षी वाल्मीकिंनी हा ग्रंथ लिहिला आहे. विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून त्याचा मर्मग्राही आलेख स्पष्ट केला आहे. रामायणातील व्यक्तिरेखा दशरथ, कौसल्या, कैकेयी, सुमित्रा, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीता, हनुमान, वाली, सुग्रीव, विभीषण, रावण, कुंभकर्ण, या व्यक्तिरेखा आणि भक्तिमार्ग प्रदीप असलेली शबरी, मानवी जीवनातील एकेका भावाचे उत्तुंग शिखर आहे. त्यांचे भाव प्रकटनातून वाल्मीकिंनी संपूर्ण मानवी जीवनाचा उत्क्रांतीपटच रेखाटला आहे. या सर्वांच्या भावविश्वाचे मध्य केंद्रक (न्यूक्लियस) मात्र राम आहे. रथचक्राच्या आऱ्याप्रमाणे सर्व जीवनरेखा या केंद्राशी निगडित आहेत. त्यामुळे सूर्यचिन्हांकित ध्वज पताकेसह इक्ष्वाकू कुळाचा हा जीवनरथ अक्षुण्णपणे, अखंडपणे धावतो आहे. युगानुयुगे तो धावतच राहणारा आहे. कथा, प्रवचन, कीर्तन, नामस्मरण, नवविधा भक्ती, रामायणातीलल व्यक्तिदर्शन, अध्यात्म, तत्त्वज्ञान या विविध आयामातून रामकथेचा हा गजर होतच राहणार आहे. त्यांत आतापर्यंत अनेकांनी सहभाग दिला आहे. स्वतःचा खारीचा वाटा उचलला आहे. रामकथेचा सेतु बांधण्यास मदत केली आहे. संवाद, कथा, कीर्तन, प्रवचनाद्वारा रामायणकथा घराघरापर्यंत, घरातील व्यक्ती व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याचा अथक व प्रमाणिक प्रयत्न केला आहे. अयोध्येतील नूतन भव्य राम मंदिरात किती कोटी लोकांनी दर्शन घेतले, किती कोटी रुपयांचा व्यवहार झाला. 'टुरिझम' कसे विकसित झाले यापेक्षा हिंदू समाजातील घराघरातील सीतारूपी मातृशक्ती स्त्रीभक्षी आणि 'जिहादी' असुरी शक्तींपासून कशी सुरक्षित ठेवता येईल आणि त्यासाठी रावणाचे दहा मस्तके 'तोडण्याचा' अतुल पराक्रमाची प्रेरणा कशी मिळेल याचे चिंतन करण्याची आवश्यकता आहे. .... 'देवदास पावती फत्ते यद्यर्थी संशय नाही' हा 'देवा -- सूर' संग्रमात सिद्ध झालेला, प्रचीतीस आलेला 'शाश्वत सिद्धांत आहे'.

९८६०२९६१३१

### 'उंच राहो गुढी तरुण भारताची'

लहानपणापासून घरी 'तरुण भारत' येत होता. रविवारच्या पुरवणीत बालविभाग होता. तो नेहमी वाचायचो. बालवय संपल्यावर सिनेमाचे आकर्षण असायचे. तेव्हा सिनेमा प्रदर्शित व्हायच्या आत त्याची स्टोरी पेपरला यायची. शशिकुमार भगत लिहायचे. ते सुद्धा नित्य वाचत असायचो. 'बंडी उलार झाली' हे सदर माझ्या अत्यंत आवडीचे होते. वहाडी भाषेतील लिखाण मला प्रचंड आवडायचं. जेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार होते तेव्हा त्यांनी बेरोजगारांसाठी भत्ता सुरू केला होता. तेव्हा त्यांनाच उद्देशून मी पहिलं वहिलं पत्र तरुण भारतात वाचकांचे मनोगत सदरात पाठवले होते त्याचे शीर्षक होते ''काय शरदराव चेष्टा करता.'' ते प्रकाशित झालं आणि आजूबाजूच्यांनी सांगितलं. तेव्हापासून विविध घटनांवर लिहिणे सुरू झाले व समाजातील इतरही लोक विविध विषय देते झाले. आजही ते अव्याहतपणे सुरूच आहे. कोण्या वाचकाचा फोन आला व कौतुकाचे दोन शब्द आले की मन सुखावून जाते. एक लेखक म्हणून तरुण भारतनेच मला घडविले आहे. मला कवी म्हणूनही ओळख तरुण भारताचीच आहे. आज या वृत्तपत्राला शंभर वर्ष झाले म्हणून मी सांगतो की ''माझ्या वृत्तपत्राला शंभर वर्ष झाले'' सोशल मीडियाच्या विविध साधनांमधून एक वृत्तपत्र नुसते टिकावे नाही तर नवनवीन संकल्पना राबवीत वाढतच जावे. आता तर पुण्यातही भरारी घेण्यास सज्ज यासारखे दुसरे कौतुक नाही. एक उत्तम व्यवस्थापन, जाणता संपादक आणि खांद्याला खांदा लावून तरुण भारताची गुढी उंच करणारे पत्रकार, कर्मचारी वृंद यांचे खरे तर अभिनंदन.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

## वाचक पत्रे

### संसदेतील चर्चेतून काँग्रेसचे वाभाडे आणि भाजपला इतिहासाची संधी

भारतीय लोकशाहीत संसदेला चर्चा आणि संवादाचे मंदिर मानले जाते. मात्र, गेल्या काही वर्षांतील लोकसभेचे कामकाज पाहिले, तर काँग्रेस पक्षाकडून उपस्थित केले जाणारे मुद्दे आणि त्यानंतर होणारी चर्चा ही काँग्रेससाठी फायद्याऐवजी तोट्याचीच ठरत असल्याचे चित्र दिसते. विशेषतः राहुल गांधी यांनी मांडलेले अविश्वास ठराव किंवा त्यांनी घडवून आणलेली आक्रमक चर्चा ही भाजपला इतिहासाचे उत्खनन करण्याची आयती संधी उपलब्ध करून देत आहे.

राहुल गांधी अनेकदा संसदेत असे प्रश्न उपस्थित करतात, ज्याचे मूळ काँग्रेसच्याच जुन्या धोरणांमध्ये असते. जेव्हा विरोधी पक्षनेते म्हणून ते सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा भाजपचे अभ्यासू नेतृत्व प्रत्युत्तर देताना वर्तमानापेक्षा काँग्रेसच्या भूतकाळावर अधिक प्रहार करते. आजच्या मतदारांमधील मोठा हिस्सा हा नवमतदार किंवा तरुण पिढीचा आहे. या पिढीने नेहरू, इंदिरा गांधी किंवा राजीव गांधी यांचा कार्यकाळ प्रत्यक्ष पाहिलेला नाही. संसदेतील या चर्चेच्या निमित्ताने जेव्हा भाजपचे नेते कलम ३७० च्या अंमलबजावणीतील ऐतिहासिक चुका, १९६२ च्या युद्धातील भूभाग किंवा बोफोर्स आणि २-जी स्पेक्ट्रमसारखे भ्रष्टाचाराचे जुने विषय पुराव्यासह मांडतात, तेव्हा ही नवीन पिढी काँग्रेसच्या इतिहासाकडे नकारात्मक दृष्टीने पाहू लागते. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भाजपचे संसद सदस्य आणि प्रवक्ते हे संसदीय आयुधांचा, नियमावलीचा आणि आकडेवारीचा सखोल अभ्यास करून सभागृहात येतात. याउलट, राहुल गांधी यांच्याकडून राफेल विमान खरेदी असो की आर्थिक धोरणांवर त्यांच्याकडून होणाऱ्या विसंगत विधाने संसदेच्या पटलावर टिकत नाहीत. जेव्हा विरोधी नेता सभागृहात विसंगत आकडेवारी मांडतो, तेव्हा भाजपचे नेते त्या संधीचा फायदा घेऊन राहुल गांधींच्या अभ्यासावर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

थोडक्यात सांगायचे तर, जोपर्यंत काँग्रेस पक्ष संसदेत अभ्यासपूर्ण मांडणी करत नाही आणि आपल्या इतिहासातील चुकांचे समर्थन करण्याऐवजी भविष्याचा ठोस अजेंडा मांडत नाही, तोपर्यंत संसदेतील प्रत्येक चर्चा त्यांच्यासाठी सेल्फ-गोल ठरत राहील. राहुल गांधींनी संसदेला आपल्याच पक्षाचे वाभाडे काढण्याचे व्यासपीठ बनवले आहे की काय, असा प्रश्न आज सर्वसामान्यांना पडतो आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### आचारसंहितेची पायमल्ली

सुसंस्कारित, सुशिक्षित आणि समंजस कसे म्हणावे हा एक प्रश्नच पडतो. कारण स्त्री-पुरुष हे कोणताही समारंभ, सामुदायिक कार्यक्रम, विवाह सोहळा किंवा अन्य निमित्ताने अशा सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमतात. खूप कालांतराने एकमेकांना भेटतात आणि घोळका करून गप्पा मारत जाण्या-येण्याच्या वाटेमध्ये उभे राहतात. त्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्यांची मोठी पंचायत होते. गप्पागोष्टीत एवढे रंगून जातात की त्यांना म्हणावे लागते, रस्ता द्या आम्हाला, जाऊ द्या म्हटले तरी त्यांना भान नसते. थोडेसुद्धा बाजूला होत नाहीत आणि बोललं तर राग येतो म्हणून काय म्हणावे अशा लोकांना प्रश्न पडतो.

**देविदास पाठक**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बीडमध्ये रंगणार रामोत्सव सोहळा,उत्सवाचा समारोप 28 मार्चला

तभा. वृत्तसेवा

**बीड** | येथे २८ मार्चपर्यंत शंकर भारती रामोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे .

हिंदू नववर्ष आणि रामनवमीच्या मुहूर्तावर बीड शहरात सरस्वती मठ, कृष्णराजनगरचे पीठाधीश्वर शंकर भारती महास्वामीजी यांच्या उपस्थितीत हा सोहळा २८ मार्च २०२६ या कालावधीत मोंढा रोडवरील रविराज मंगल कार्यालय येथे संपन्न होणार आहे.

उत्सवादरम्यान दररोज पहाटे ५:३० वाजल्यापासून रात्री ८:३० वाजेपर्यंत विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत. यात प्रामुख्याने दैनिक कार्यक्रमात प्रातः नित्य पूजन, श्री चर्तुवेद पारायण, रामोत्सव विशेष कल्पोक्त पूजा, अष्टावधान सेवा आणि सायंकाळी नित्य पूजा होईल. विजय यात्रा स्वागत समिती, बीड तर्फे सर्व हिंदू बांधवांना आणि भाविकांना या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दर्शन आणि पूजेसाठी येताना भाविकांनी भारतीय पोशाखात यावे, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## घरकुल लाभार्थींना एक लाख रुपये प्रति घरकुल प्रमाणे पहिल्या हप्त्याचे वितरण

तभा. वृत्तसेवा

**बीड** | गुढी पाडव्याच्या शुभदिनी परळी नगर परिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना २.० च्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या ६७७ घरकुल लाभार्थींना एक लाख रुपये प्रति घरकुल प्रमाणे पहिल्या हप्त्याचे वितरण आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

रमाई आवास योजनेतून आणखी २०० घरकुले मंजूर करण्यात आली असून त्याचे प्रस्ताव व अन्य बाबी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. त्याचबरोबर ५% निधीतून दिव्यांग बांधवांना देण्यात येणाऱ्या आर्थिक लाभाचेही वितरण करण्यात आले.



आमदार मुंडे यांनी सांगितले की, नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीत परळीकरांनी भरघोस मतांनी महायुतीला विजय मिळवून दिला. घरकुल सह वैयक्तिक लाभाच्या योजना आणि सार्वजनिक हिताच्या विकास कामात दुप्पट संख्येने आणि दुप्पट वेगाने काम करत राहू, असा शब्द यावेळी दिला.

## अवकाळीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून मदत करा : पंकजा मुंडेंचे निर्देश

तभा. वृत्तसेवा

**बीड** | जिल्हयात काल आणि परवा गारपिटीसह झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची ना. पंकजाताई मुंडे यांनी प्रशासनाकडून सर्व माहिती घेतली. बीड, वडवणी, आष्टीसह अन्य तालुक्यालाही कमी अधिक प्रमाणात याचा फटका बसला आहे.शेतातील उभ्या पिकांचे नुकसान झाले आहे. आंबा, टरबूज, मोसंबी या फळबागांचे तर गहू, हरभरा, ज्वारी, कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मळणीसाठी काढून ठेवलेली पिके भिजल्याने त्याचेही नुकसान झाले आहे. अवकाळीमुळे शेतकऱ्यांवर आलेले संकट पाहता या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत असे निर्देश देऊन शासनाच्या संबंधित विभागाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.

## अंबाजोगाई बसस्थानकात दोन महिलांचा धुडगूस; अघोरी कृत्यामुळे प्रवाशांमध्ये भीती

तभा. वृत्तसेवा

**बीड** | अंबाजोगाई येथील मध्यवर्ती बसस्थानकात दोन महिलांनी धुमाकूळ घातल्याने प्रवाशांमध्ये प्रचंड घबराट पसरली. या महिलांनी धावत्या बसेस अडवून चालकांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली आणि बससमोर लिंबू कापून 'भानामती' सदृश्य अघोरी प्रकार केले. सुमारे एक तास चाललेल्या या प्रकारामुळे बसस्थानकातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

घटनेच्या वेळी तिथे एकही सुरक्षा रक्षक किंवा पोलीस कर्मचारी तैनात नसल्याने या महिलांचे धाडस वाढले होते.



या धक्कादायक प्रकारामुळे करणी-बाधेच्या भीतीने अनेक प्रवाशांनी बसमध्ये चढण्यासही धास्ती घेतली होती. या गंभीर घटनेची दखल घेत आगार प्रमुखांनी अंबाजोगाई शहर पोलिसांना लेखी निवेदन देऊन तातडीने बंदोबस्त वाढवण्याची मागणी केली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बसस्थानक परिसरात कायमस्वरूपी पोलीस गस्त असणे आवश्यक असल्याचे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## माजलगावात राजे मल्हारराव होळकर जयंती उत्साहात साजरी

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव** | राजे मल्हारराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरात उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करून राजे मल्हारराव होळकरांना अभिवादन करण्यात आले,यावेळी उपस्थितांनी राजे मल्हारराव होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शौर्यपूर्ण व जनकल्याणकारी कार्याची आठवण करून दिली.

या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले,भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके ,माजी समाज कल्याण सभापती कल्याण आबुज ,नगरसेवक शरद यादव ,अर्जुन नाईकनवरे,आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे, मा.जि.प.सदस्य बबनराव सरवदे,प्रकाश गवते,शिवसेना शहरप्रमुख पापा सोंळके, युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे यांच्या सह विविध पक्ष, संघटांनाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने , मल्हार सेनेचे कार्याध्यक्ष अशोक डोणे, व त्यांच्या कार्यकर्त्यांनी केले होते.

## 5 लाखासाठी पत्नीचा छळ करून दागिने लुटले; गर्भपात करून तलाक दिला

**आष्टी** | माहेरहून पाच लाख रुपये आणावे यासाठी विवाहितेचा छळ करून तिचा गर्भपात केला. दागिने लुटून तलाख देत घराबाहेर काढल्याचा धक्कादायक प्रकार कडा येथे घडला आहे. याप्रकरणी सासरच्या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आठ वर्षांपूर्वी तब्बोसूम गुलामरसूल शेख (वय २६) यांचा विवाह गेवराई येथील गुलामरसूल इब्राहीम शेख याच्याशी मुस्लीम रीती रिवाजा प्रमाणे झाला होता. लग्नात ऐपतीप्रमाणे दागिने आणि संसारोपयोगी वस्तू माहेरच्या मंडळींनी दिल्या. लग्नानंतर सहा महिने चांगले वागवले. त्यानंतर मात्र सासरच्या मंडळींनी आपला खरा चेहरा दाखवायला सुरुवात केली. "तू वांझोटी आहेस, पांढऱ्या पायाची आहेस," असे टोमणे मारत तिला उपाशीपोटी ठेवून तिचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. पीडितेने तक्रारीत सांगितलेला प्रकार अंगावर शहारे आणणारा आहे. तिला यापूर्वी गर्भ राहिला असता पतीने जबरदस्तीने गोळ्या खाऊ घालून तिचा गर्भपात केला. आता पुन्हा दीड महिन्यांची गर्भवती असताना, पतीने तिला "तुला मूलबाळ होऊ देणार नाही, तुला फक्त कामासाठी आणले आहे," असे म्हणत पोटावर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. "गाडी घेण्यासाठी तुझ्या बापाकडून ५ लाख रुपये घेऊन ये," असा तगादा सासरच्यांनी लावला होता.१५ मार्च रोजी पीडितेच्या आईने सासरी येऊन याबाबत विचारणा केली की, "मुलगी गरोदर आहे, तिला दवाखान्यात का नेत नाही?" याचा राग येऊन पती गुलामरसूल, सासू अहेमदबी आणि नणंद आयेशा यांनी पीडितेचे हात दाबून धरले, तर पतीने तिचा गळा दाबून तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सासरे आणि नंदावा यांनी घराचा दरवाजा लावून घेत माय-लेकीला जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. याबरोबरच तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेत पतीने पीडितेला बेकायदेशीर रीत्या तलाक दिला. तसेच घराच्या बाहेर हाकलून दिले. पीडितेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुलामरसूल इब्राहीम शेख (पती), अहेमदबी इब्राहीम शेख (सासू), इब्राहीम मोहम्मद शेख (सासरा), आशिया मौजम सय्यद (नणंद), मौजम सय्यद (नंदावा) यांच्याविरोधात आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास आष्टी पोलीस करीत आहेत

## थकबाकीदारांचा वीजपुरवठा होणार खंडित



**बीड** | बीड जिल्ह्यात वीजबिलाची थकबाकी वाढल्याने महावितरणने मार्च अखेरच्या पार्श्वभूमीवर वसुली मोहीम अत्यंत तीव्र केली आहे. जिल्ह्यातील सुमारे सव्वादोन लाख ग्राहकांकडे १५५ कोटी ३७ लाख रुपयांची थकबाकी असून चालू महिन्याची वसुली केवळ ६२ टक्केच झाली आहे. लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात असून जे ग्राहक बिल भरण्यास प्रतिसाद देत नाहीत, त्यांचा वीजपुरवठा थेट मीटर काढून खंडित केला जात आहे. स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांचा पुरवठा स्वयंचलितपणे बंद होत असून अनधिकृतपणे वीज जोडल्यास पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचा कडक इशारा देण्यात आला आहे. अंबाजोगाई आणि बीड विभागातील थकबाकीचे मोठे आव्हान समोर असल्याने सुट्टीच्या दिवशीही कर्मचारी घरोघरी जाऊन वसुली करत आहेत. कारवाईची कटू वेळ टाळण्यासाठी सर्व वीज ग्राहकांनी चालू देयकासह आपली थकबाकी त्वरित भरून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंत्यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांनी बसस्थानकाचा परिसर केला चकाचक

तभा. वृत्तसेवा

**बीड** | योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत अंबाजोगाई बसस्थानकाचा परिसर अवघ्या चकाचक केला. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राबवण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत महाविद्यालयाच्या प्रथम वर्षातील तब्बल १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांनी केवळ हातामध्ये झाडू घेऊन परिसर स्वच्छ केला नाही, तर बसस्थानक परिसरातील वाढलेली झुडपे आणि अनावश्यक गवत काढून प्रवाशांसाठी हा परिसर सुरक्षित आणि मोकळा केला. या उपक्रमात बसस्थानकातील कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांना मोलाची मदत केली.



अंबाजोगाई आगार प्रमुख अमर राऊत, स्थानक प्रमुख हरिदास गिरी आणि प्राचार्य रमण देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही मोहीम यशस्वीपणे राबवण्यात आली. प्राध्यापक नारायण सिरसाट आणि शाम गडदे यांच्यासह शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांना याकामी मार्गदर्शन केले.

सार्वजनिक मालमत्तेची निगा राखण्याची जबाबदारी केवळ प्रशासनाची नसून ती प्रत्येक सजग नागरिकाची आहे. हा मोलाचा संदेश या तरुण विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून समाजाला दिला आहे.

## एकनाथ शिंदे यांनी दिले बीड जिल्ह्यातील बोगस मयत बांधकाम कामगारांच्या चौकशीचे आदेश

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | बीड जिल्हा सरकारी कामगार अधिकारी कार्यालय व तालुका कामगार अधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून शेकडो मयत व्यक्तींना जिवंत दाखवून कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचा गंभीर प्रकार सुरू आहे. बीड जिल्ह्यात होत असलेल्या बोगस मयत बांधकाम कामगार घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी निवेदनाद्वारे शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत शिंदे यांनी तातडीने चौकशीचे आदेश प्रधान सचिव कामगार यांना दिले आहेत.

मार्च २०२० ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आधीच मृत झालेल्या शेकडो व्यक्तींना कामगार म्हणून नोंदवण्यात आले. त्यांना ९० दिवस काम केल्याचे खोटे प्रमाणपत्र देण्यात आले. काही प्रकरणांमध्ये शेकडो मृत व्यक्तींना पुन्हा जिवंत दाखवून त्यानंतर दुसऱ्यांदा मृत घोषित करत नगर पालिकेकडून खोटी मृत्यू प्रमाणपत्रे तयार करण्यात आली. शासनाच्या कल्याणकारी योजनांतील निधी बोगस कामगारांच्या नावावर काढून मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी जिल्हा सरकारी कामगार अधिकारी, तालुका सरकारी अधिकारी तसेच बोगस मयतांच्या वारसांवर गुन्हे दाखल करावेत व शासनाचा अपहार केलेल्या पैशाची सबंधितांकडून सक्तीची वसुली करण्यात यावी अशी मागणी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी निवेदनाद्वारे राज्याचे संवेदनशिल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

## गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर भूमी सुपोषण व संरक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

तभा. वृत्तसेवा

**आंबाजोगाई** | दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र, आंबाजोगाई यांच्या वतीने दि. १९ मार्च २०२६ रोजी गुढीपाडवा या शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या सांस्कृतिक सणाच्या शुभमुहूर्तावर देवळा येथे भूमी सुपोषण व संरक्षण कार्यक्रम उत्साहात व शेतकऱ्यांच्या मोठ्या सहभागात पार पडला. नवीन वर्षाच्या प्रारंभी भूमी पूजन व सुपोषणाचा संकल्प करून शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत



देशमुख यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी मृदा सुपोषणाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, “शेतीची खरी ताकद ही मातीच्या आरोग्यात आहे.” सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, गांडुळखत, हिरवळीची खते, पीक फेरपालट, आच्छादन पद्धती (मल्चिंग) आणि जैवखते यांचा समतोल वापर करून मृदा सुपोषण कसे सुनिश्चित करता येईल, याबाबत त्यांनी शास्त्रीय माहिती दिली.

## शेतात गांजाची लागवड; साडेपाच लाखाचा मुद्देमाल जप्त

तभा. वृत्तसेवा

**बीड** | शेतात वैयक्तिक फायद्यासाठी गांजाची लागवड केल्याची माहिती वडवणी पोलीस ठाण्याच्या सपोनि वर्षा व्हगाडे यांना मिळाल्यावरून मारलेल्या छाप्यात साडेपाच लाखाच्या गांजाची झाड जप्त करण्यात आली.

वडवणी पोलीस ठाणे हद्दीतील लोणावळ शिवारात गांजाची लागवड केली असल्याची गुप्त माहिती वडवणी पोलीस ठाण्याच्या सपोनी वर्षा व्हगाडे यांना मिळाली. या माहितीच्या आधारे लोणावळा शिवारातील गट नंबर 15 मधील आशाबाई औदुंबर शिनगारे यांच्या



शेतात पोलिसांनी छापा मारला. यावेळी शेतामध्ये गांजा पिकाची लागवड करण्यात आल्याच निदर्शनास आलं. पोलिसांनी या छाप्यादरम्यान 21 किलो 960 ग्रॅम गांजाची झाड जप्त केली. याची बाजारी किंमत पाच लाख 49 हजार इतकी आहे. याप्रकरणी महिला शेतकऱ्यास पोलिसांनी अटक केली असून कलम 8 सी,20(बी)(2)(सी) एन डी पी एस ॲक्ट 1985 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावंत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, ऋषिकेश शिंदे उप विभाग माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक वर्षा व्हेगाडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्याम गायकवाड, अशोक क्षीरसागर, विलास खरात, बिभीषण गुंजाळ, आशुतोष नाईकवाडे, हनुमंत कप्पे विश्वजीत मुंडे, सय्यद अमीर, वसंत करे, रामनाथ शिनगारे यांच्या पथकाने केली.

## विश्वरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर खासबाग जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर

### अध्यक्षपदी : आतिष वडमारे सचिव-प्रतिक भोले तर उपाध्यक्षपदी विशाल वडमारे यांची निवड

तभा. वृत्तसेवा

**बीड प्रतिनिधी** | बुधवार दिनांक १८/३/२०२६ रोजी नालंदा बुद्ध विहार येथे अरुण भोले (अण्णा) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

या बैठकीचे प्रास्ताविक संतोष निकाळजे यांनी केले. या बैठकी मध्ये विविध विषयावर चर्चा करण्यात येऊन सर्वानुमते कार्यकारणी जाहीर करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या अध्यक्षपदी आतिष वडमारे,सचिव प्रतिक भोले, उपाध्यक्षपदी विशाल वडमारे यांची निवड करण्यात आली.



पुढील कार्यकारणी अध्यक्ष:- अतिष वडमारे उपाध्यक्ष:- विशाल वडमारे,संदीप चांदणे सचिव:- प्रतिक भोले, सहसचिव:- प्रदीप वीर,सनी शिंदे, कोषाध्यक्ष:- प्रकाश कदम,संतोष चक्रे/बबलू ओव्हाळ, सहकोषाध्यक्ष:- रोहित भोले,अनिकेत वडमारे,सागर जावळे, संघटक:- विशाल (पप्पू) वडमारे, कुणाल बोराडे, सहसंघटक:-अजय साळवे,ब्रिजेश वडमारे,विशाल बोराडे, प्रसिद्धी प्रमुख:- प्रवीण वडमारे,महादेव भालेराव, संरक्षण प्रमुख:- रोहन डोंगरे,अनुप दळवी,शैलेश बोराडे, कार्याध्यक्ष:- रवी धुरंधरे,साहिल वडमारे,हर्ष वाघमारे, सहकार्याध्यक्ष:- सतिश सौंदरमल,मंगेश शिंदे, स्वागताध्यक्ष:- श्रावण बोराडे, स्वप्निल जावळे, व्यवस्थापक :- गणेश दळवी,सोनू गायकवाड,सुशांत जावळे,अक्षय वडमारे,सिद्धांत सरपते,संघर्ष वडमारे आदित्य गवळी, मार्गदर्शक :- दिनकर बोराडे, अरुण भोले, हनुमंत वाघमारे, बंडू दळवी, मारोती शिंदे, मोहन जावळे ,राजू डोंगरे, संजय जाधव, मिलिंद भोले, तुकाराम वडमारे,ॲड नितीन वाघमारे, संतोष (बाळू) वडमारे, अनिल डोळस, श्रीरंग वडमारे, शहादेव चक्रे, संतोष निकाळजे,शैलेश जोगदंड, विकास सरवदे,अशोक दळवी, संतोष गायकवाड, मनोज वीर.,

उपस्थित :- विकास वडमारे, महेंद्र वीर, किरण बोराडे, नितीन कांडेकर, प्रकाश दळवी, रोहित डोंगरे, सुजीत जावळे, संघराज बोराडे, सिद्धांत वडमारे, धम्मजीत जावळे, रविराज बोराडे, अतुल वडमारे, स्वप्निल जावळे, गजानन निकाळजे, अमोल हराळे, शशिकांत जाधव, बाळू इंगळे, बाळू बोराडे, दादा वडमारे, प्रमोद चक्रे, रितेश कांडेकर, बाळकृष्ण गायकवाड, ईश्वर वाघमारे,संकेत वडमारे सिद्धार्थ सौंदरमल, कुणाल वाघमारे,मनोज दळवी, रोहन गायकवाड, कुणाल जाधव, सुजल जाधव,सुबोध जावळे, सुरज बोराडे, संस्कार सौंदरमल मयूर भालेराव दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सांस्कृती कार्यक्रमाचे आयोजन कारण्यात आले असून. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

## बीडमध्ये हिंदू नववर्षानिमित्त भव्य पालखी मिरवणूक व शोभायात्रा उत्साहात

तभा. वृत्तसेवा

**बीड** | हिंदू नववर्षाच्या स्वागतानिमित्त जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संप्रदाय जिल्हा सेवा समिती, बीड यांच्या वतीने भव्य पालखी मिरवणूक व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले.ही मिरवणूक बालाजी मंदिर येथून सुरू होऊन सुभाष रोड, साठे चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान येथे उत्साहात पार पडली.

मिरवणुकीदरम्यान भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात कुर्ला



येथील लेझीम पथकाने आकर्षक सादरीकरण करून वातावरण अधिक रंगतदार केले. तसेच विविध वेशभूषेत सहभागी झालेले विद्यार्थी आणि नागरिकांनीही लक्ष वेधून घेतले. विशेषतः ज्ञानसागर गुरुकुलची वानर सेना तसेच राम पंचायतचे राम-लक्ष्मण वेशभूषेतील सहभागी हे शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले.संपूर्ण मिरवणूक भक्तिमय वातावरणात आणि उत्साहपूर्ण प्रतिसादात पार पडली.

# इडोळी जि प शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपकरणाचा राज्यात प्रथम क्रमांक

## मळणी यंत्रांवर काम करणाऱ्या शेतमजूरांचे अपघात रोखणारे उपकरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**

तालुक्यातील इडोळी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षिकेने टू स्टेज स्मार्ट थ्रेशर हे उपकरण तयार केले. या उपकरणाला राज्यस्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत राज्यात प्रथम क्रमांक मिळाला असून मळणी यंत्रावर काम करतांना शेतकरी, शेतमजूर यांचे अपघात रोखण्यास मदत होणार आहे. या विद्यार्थी आणि शिक्षिकेचा पुणे येथील कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

राज्यात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व लिडरशिप फॉर इक्विटी यांच्यावतीने दि १६ मार्च ते १८ मार्च या कालावधीत राज्यस्तरीय हॅकेथॉन स्पर्धा घेण्यात आली. तत्पूर्वी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करून माहीती घेण्यात आली होती. त्यानुसार हिंगोली तालुक्यातील इडोळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सातवी वर्गातील विद्यार्थीनी तेजल जाधव, वेदीका जाधव, अनुराधा टेकाळे यांनी शिक्षिका दिपाली ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी करून उपकरणाची माहिती दिली. त्यानंतर त्यांना आयोजकांकडून विविध आठ ते दहा प्रकारचे सेन्सर व इतर पार्टचा पुरवठा करण्यात आला. या सेन्सरमध्ये कोडींग करून व पार्टच्या माध्यमातून विद्यार्थीनींनी स्मार्ट थ्रेशर हे उपकरण तयार केले. सध्या पिकांची मळणी करतांना मळणी यंत्रात पिके टाकतांना थोडीही चूक शेतकरी, शेतमजूरांच्या जीवावर बेतते. यामुळे दरवर्षी अनेक अपघात होतात. सदर अपघात रोखण्यासाठी विद्यार्थीनींनी स्मार्ट थ्रेशर तयार केले. यामध्ये टू स्टेज लावण्यात आल्या आहेत. यामध्ये मळणी यंत्रामध्ये हात सुरक्षित अंतराच्या पुढे जात असल्यास लगेचच अलार्म वाजतो व धोक्याची सूचना मिळते तर मळणी यंत्रात सुरक्षित अंतराच्या पुढे गेल्यानंतर अलार्म वाजून मळणी यंत्र आपोआप बंद पडते. या उपकरणामुळे शेतकरी व शेतमजूरांचे अपघात टाळणे शक्य होणार असल्याचे दाखवून देण्यात आले. पुणे येथे दि १६ ते १८ मार्च या कालावधीत झालेल्या हॅकेथॉन स्पर्धेत या उपकरणाचे सादरीकरण करण्यात आले.

इडोळी सारख्या ग्रामीण भागातील शाळेने शेतकऱ्याच्या महत्वाच्या समस्येवर तयार केलेल्या उपकरणाला राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्याबद्दल विद्यार्थीनी तेजल जाधव, वेदीका जाधव, अनुराधा टेकाळे तसेच मार्गदर्शक शिक्षिका दिपाली ढोले यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिवाणे, शिक्षणाधिकारी आसावरी काळे, मुख्याध्यापक अशोक देवकर, शिक्षक संजय भक्कड, बंडू पुरी, अनिता जाधव, मनिषा पवार, सतीश कापसे, राजेश्वर पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे हनुमान जाधव, भानुदास जाधव, रामेश्वर टेकाळे, विठ्ठल जाधव, वैजनाथ जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

# व्यंकटेश नेत्रालयातून शासकीय योजनेचा लाभ घ्यावा- गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**

नेत्र रुग्णांनी व्यंकटेश नेत्रालय व फेको सेंटर मधून मोफत शासकीय योजनांच्या माध्यमातून रितसर लाभान्वित व्हावे, असे आवाहन हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

व्यंकटेश नेत्रालय अँड फको सेंटर मध्ये हिंगोली येथे नेत्ररुग्ण सेवार्थ जागतिक कीर्तीच्या कंपन्यांच्या विविध मशिनरी व संगणकीय यंत्रणा च्या शुभारंभ करताना ते बोलत होते. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, महाराष्ट्र राज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण संघाचे राज्यकार्याध्यक्ष डॉ.विजय निलावार, समाजभूषण विक्रम जावळे, ज्येष्ट समाजसेवक दुर्गादास साकळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रोफसर डॉ.सचिन बोधगिरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या प्रसंगी डॉ.किशन लखमावार व डॉ.प्रतीक लखमावार ह्या नेत्रशल्य चिकित्सकानी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व उपस्थितांना माहिती दिली. व्यंकटेश नेत्रालयात अत्याधुनिक मशीनची जिल्ह्यात प्रथमच सुरुवात करण्यात आली असे सांगून या तंत्रज्ञानामुळे डोळ्यांचे अचूक मोजमाप होऊन मोतीबिंदू ऑपरेशनसाठी कृत्रिम लेन्सची योग्य पॉवर निश्चित करता येणार आहे. परिणामी, ऑपरेशननंतर चष्म्याचा नंबर कमी राहण्यास किंवा काही रुग्णांना चष्म्याशिवाय स्पष्ट दिसण्यास मदत होणार आहे. तसेच, इ-डलरप मशीनमुळे रेटिनाचे विकार, रक्तस्त्राव व इतर अंतर्गत डोळ्यांचे आजार अधिक अचूकपणे ओळखणे शक्य होणार आहे असे म्हंटले. या आधुनिक सुविधेमुळे आता हिंगोली जिल्ह्यातील रुग्णांना छत्रपती संभाजीनगर किंवा मुंबई येथे जाण्याची गरज भासणार नाही, अशी माहिती ज्येष्ठ नेत्र शल्य चिकित्सक डॉ. किशन लखमावार रेटिना सुपर स्पेशालिस्ट डॉ. प्रतिक लखमावार यांनी याप्रसंगी माहीती दिली.व्यंकटेश नेत्रालय येथे महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत रेटिनाचे उपचार उपलब्ध असून, सर्वसामान्य रुग्णांना याचा मोठा लाभ होणार आहे. याप्रसंगी सौ.ज्योत्स्ना लखमावार, डॉ.नेहा बोधगिरे, माँही बोधगिरे व हॉस्पिटल स्टाफ, नेत्र रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन दिप प्रज्वलनाने व फित कापून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले तसेच बारकाईने संगणकीय अत्याधुनिक यंत्रणेची माहिती घेतली.स्वागतपर प्रास्ताविक डॉ. किशन लखमावार तर संचालन ज्येष्ठ पत्रकार डॉ.विजय निलावार आणि आभार प्रदर्शन डॉ.प्रतीक लखमावार यांनी मानले.

# हिंगोलीत स्वामी समर्थ मंदिरात प्रगटदिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**



शहरातील नाईक नगर भागातील दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ मंदिरामध्ये आज श्री स्वामी समर्थ महाराज यांचा प्रगट दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रगट दिनाचे औचित्य साधून सकाळी श्रींच्या मूर्तीचा अभिषेक व पूजन करण्यात आले. त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या विशेष महाआरतीमध्ये परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. 'श्री स्वामी समर्थ' यांच्या जयघोषाने संपूर्ण नाईक नगर परिसर भक्तीत न्हाऊन निघाला होता.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे आयोजित केलेला महाप्रसाद. दुपारच्या सत्रात दर्शनासाठी आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यामध्ये महिला भाविकांचा मोठा सहभाग दिसून आला.

पुरुष व बालकांनीही शिस्तबद्ध पद्धतीने महाआरती आणि प्रसादाचा आनंद घेतला.

मंदिरातील स्वयंसेवकांनी आणि उत्सव समितीने भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून चोख नियोजन केले होते. प्रगट दिनानिमित्त करण्यात आलेल्या फुलांच्या सजावटीमुळे मंदिराला अत्यंत प्रसन्न स्वरूप प्राप्त झाले होते. दिवसभर चाललेल्या या सोहळ्यामुळे नाईक नगर भागात चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले.



**हिंगोली- मुस्लीम बांधवांचा पवित्र सण रमजान ईद निमित्त कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शहरातून पोलिस विभागाच्यावतीने पथसंचलन करण्यात आले. यावेळी पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी तसेच गृहरक्षक दलाचे जवान सहभागी झाले होते. छाया- लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### चित्ररथाद्वारे योजनांची जनजागृती



हिंगोली- जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५-२०२६ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. हिंगोली जिल्ह्यातील कोथळज, माळहिवरा, पेडगाव, लिंबाळा, पारडा, खंडाळा, माळहिवरा, येळी, आडगाव, खरवड, उमरा, वारंगा मसाई आदी गावामध्ये चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यात आली. या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला सामाजिक न्याय विभागाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### द्रौपदराव महिपती घुगे यांचे निधन



हिंगोली-कळमनुरी तालुक्यातील सेलसुरा येथील रहिवाशी द्रोपदराव महिपती घुगे (७५) यांचे १९ मार्च गुरूवार रोजी रात्री ९ वाजता निधन झाले. त्यांच्यावर २० मार्च शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता अमरधाम पंचवटी नाशिक येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. द्रोपदराव घुगे हे पुर्णवादी परिवारात त्यांचे मोलाचे कार्य होते. हिंगोली, सेलसुरा येथे जीवन कला मंदिर उभारणीत त्यांचा मोठा सहभाग होता. हिंगणी येथील सती मणकर्णीबाई पारनेरकर विद्यालयाचे माजी संचालक व परभणी-हिंगोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत व्यवस्थापक म्हणून ही त्यांनी कार्य बजावले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे.डॉ.गणेश घुगे व डॉ. सुहास घुगे यांचे ते वडील होत.

# परमात्मा सतस्वरूप आहे मात्र परंपरा विसरू नका- प. पू. रमेशभाई ओझा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**




येथे गुरुवार पासून सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथा सप्ताहात आंतरराष्ट्रीय कथाकार रमेशभाई ओझा यांनी आजच्या पहिल्या दिवसाच्या प्रवचनात परमात्म्याच्या स्वरूपावर आणि भारतीय संस्कृतीच्या परंपरेवर सखोल मार्गदर्शन केले. परमात्मा हा सतस्वरूप आहे, तो सदैव सत्य, चैतन्य आणि आनंदाने परिपूर्ण आहे, असे सांगत त्यांनी उपस्थित भाविकांना आध्यात्मिक चिंतनाची दिशा दिली.

यावेळी बोलताना त्यांनी महाभारतातील विविध पैलूंवर प्रकाश टाकत जीवनातील नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. महाभारत केवळ युद्धकथा नसून, ती मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान शिकवणारी महान ग्रंथरचना आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, आपण आपल्या परंपरा आणि संस्कृती विसरू नयेत, कारण त्यामध्येच आपल्या जीवनाचा खरा आधार आहे, असे सांगत त्यांनी आधुनिक काळातही संस्कार जपण्याचे आवाहन केले.

रमेशभाई ओझा यांनी भागवत ग्रंथाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, प्रत्येक युगात व्यास होतात आणि तेच धर्म, ज्ञान व संस्कृतीचा प्रसार करतात. भागवतामध्ये २४ अवतारांचे वर्णन असून, प्रत्येक अवतार मानवजातीला मार्गदर्शन करणारा आहे, असे त्यांनी नमूद केले.

या प्रवचनाला मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती. भक्तांनी नामस्मरण, भजन आणि कीर्तनाच्या माध्यमातून अध्यात्मिक वातावरण अनुभवले. संपूर्ण परिसर भक्तिमय झाला असून, भागवत कथेचा लाभ घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

प्रारंभी द्विप प्रज्वलन झाल्यानंतर सत्कर्म नित्य करा, आणि सत्संग नेहमी सुरु ठेवले पाहिजे असे सांगून इंद्र, तारे, भगवान कृष्ण,सुष्टी, पृथ्वी अगोदर पासून अस्तित्वात आहे. मात्र नावे नंतर दिल्या गेली असे स्पष्ट करीत आपले दादा, परदादा आपल्याला माहित नाहीत परंतू आपण त्यांचे वंश आहोत, आजकाल शासन दरबारी जन्म नोंद, आदी नोंदी केल्या जातात. आपल्या घरात कोणीही येऊ शकत नाही कारण आपल्या घराची मूळ नोंद केली असते. असे अनेक दाखले देत हृदय हे देखील घर आहे असे सांगून सर्व इंद्रिय आपल्या हालचाली करतात त्यामुळे आपण धन्यता मानली पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले. कर धन्य है तो सत्कर्म करे असे सांगत स्वच्छता ही आज काळजी गरज असून आपण घरात रोज झाडू मारतो, तसेच हृदय हे घर आहे याची काळजी घेणे ही तितकेच महतवाचे आहे.

कथा कानाने ऐकल्यास निश्चित भगवान आपल्या अंतरमाणात विराजमान होतात असे सांगत हरी शरणम, हरी बोल या मंत्राचा जागर केला.पुढे बोलताना म्हणाले, सृष्टीमध्ये हालचाल आहे, आणि चैतन्य हे तत्व आहे, परमात्मा चित्त आहे. म्हणून सुख, दुःख, राग, लोभ बाजूला सारून जीवनाचा आनंद घ्यायला शिका असे त्यांनी सांगितले. भागवत मधील स्कंध पुराण मध्ये स्वरूप कसे आहे, त्याची ओळख म्हणजे सच्चीदानंद आहे. म्हणजेच परमात्मा हा सत स्वरूप असल्याचे अधोरेखित केले.

# हजारो भाविकांच्या उपस्थितीत शोभायात्रा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

येथील गणेश मंदिर सेक्रेट हार्ट इंग्लिश स्कुल पासून दोन वाजता निघालेल्या श्रीमद भागवत कथा शोभा यात्रेत ढोल तास्यांच्या गजरात महिला, पुरुष सहभागी झाले होते. या शोभा यात्रेत यवतमाळ येथील बंजारा समाजाचे डफली नृत्य सर्वांचे आकर्षण ठसले.

गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर गजराज बाल गणेश मंडळाच्या पुढाकारातून येथील राम लीला मैदानावर अंतरराष्ट्रीय कथाकार प. पू. भाईश्री रमेशभाई ओझा यांची श्रीमद भागवत कथेला गुरुवार पासून शोभायात्रा गणेश मंदिरापासून दुपारी दोन वाजता काढण्यात आली. या शोभा यात्रेत सुरुवातीला मुख्य यजमान म्हणून स्व. मखनलाल शंकरलाल गौड यांच्या स्मृती प्रित्यर्थ नंदकिशोर शर्मा म्हाळसा पुरवाले यांच्या कुटुंबियांनी ग्रंथ डोक्यावर घेतले. त्यानंतर आश्व, बँड पथक, कलश धारी महिला, यवतमाळ येथील बंजारा पथक, बोरजा येथील शाळेतील बाल वारकरी, पुरुष मंडळी, अश्वरथात विराजमान राधा कृष्ण यांची प्रतिकृती अशी शोभा यात्रेत रचना केली होती.

या शोभा यात्रेत वारकरी आपल्या धोतर, शर्ट, टोपी परिधान केले होते. टाळ तर कपाळावर टिळा तर बंजारा समाजाच्या पथकाने पारंपरिक वेशभुषेत डफडीवर नृत्य सादर केले. तर कलशधारी महिलांनी आणि पुरुषांनी वेगवेगळ्या वेशभुशेत सहभागी झाले होते. दरम्यान, ही शोभायात्रा पोस्ट ऑफिस, जवाहर रोड, आखरे मेडिकल, गांधी चौक मार्गे महाविर स्तंभ, इंदिरा चौक मार्गे कथा स्थळी चारच्या सुमारास दाखल झाली.

शोभायात्रा मार्गक्रमण करीत असताना ठीक ठिकाणी पाणी, मठा, दूध, आदी वाटप करण्यात आले. दरम्यान, ही शोभायात्रा कथा स्थळी दाखल झाल्यानंतर प.पू.रमेश भाई ओझा यांचे श्रीमद भागवत कथे ठिकाणी आगमन होताच मुख्य यजमान यांच्या हस्ते पूजन करून स्वागत करण्यात आले. त्यानंतर गजराज बाल गणेश मंडळाच्या पदाधिकारी यांच्या हस्ते द्विप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर पावणे पाच वाजता कथेला सुरुवात झाली.

# पाच दिवसाआड शहराला पाणीपुरवठा, नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

शहरात भीषण पाणीटंचाईचे सावट गडद होत असून, नगरपालिकेचा पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. शहरात सध्या चार ते पाच दिवसाआड पाणी येत असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना 'वणवण' भटकण्याची वेळ आली आहे.

पाणीटंचाईचे दाहक वास्तव जिल्हा परिषद रोडवर पाहायला मिळाले. शहराच्या खुशाल नगर भागातील एक कुटुंब पिण्याच्या पाण्यासाठी चक्क तीन किलोमीटर दूरवरून पायपीट करत सार्वजनिक नळावरून पाणी नेताना दिसून आले. उन्हाचा तडाखा वाढत असताना, हंडाभर पाण्यासाठी या कुटुंबाला करावी लागणारी 'मरमर' शहरातील पाणी नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे.

शहरातील बहुतांश भागात नळाला पाणी येत नसल्याने नागरिक सायकल, दुचाकी किंवा डोक्यावर हंडे घेऊन पाण्याच्या शोधात फिरत आहेत. जिल्हा परिषद रोडवरील सार्वजनिक नळावर सकाळपासूनच पाण्यासाठी रांगा लागत असून, दूर अंतरावरून येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. नगर पालिका चार ते पाच दिवसानंतर पाणीपुरवठा करीत असल्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी शहरातील नागरिकांमधून होत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पायाभूत सुविधा बळकटीसाठी ठोस निर्णयांवर भर : मंत्री संजय राठोड

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २० मार्च-

देश व राज्य पातळीवर पायाभूत सुविधा मजबूत करण्यासह सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाकडून ठोस व धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत, असे प्रतिपादन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

माहूर तालुक्यातील पैनगंगा नदीपात्रात उभारण्यात येणाऱ्या शक्तिपीठ बंधाऱ्याच्या भूमिपूजन सोहळ्यावेळी ते बोलत होते. दीक्षागुरू प्रेमसिंगजी (बापू) महाराज यांच्या हस्ते भूमिपूजन पार पडले. यावेळी आमदार भीमराव केराम, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार किसनराव वानखेडे, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, माजी जि.प. उपाध्यक्ष समाधान जाधव, धरमसिंग राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री राठोड म्हणाले की, माहूर गडावर



दरवर्षी लाखो भाविक येतात व पैनगंगा नदीत स्नान करतात; मात्र आवश्यक सुविधा अपुऱ्या होत्या. शक्तिपीठ बंधाऱ्याच्या माध्यमातून भाविकांना विविध सुविधा उपलब्ध होणार असून हा प्रकल्प वर्षभरात पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच विकासकामांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, ही शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार भीमराव केराम यांनी सांगितले की, प्रेमसिंगजी (बापू) महाराज यांनी विनामोबदला जमीन उपलब्ध करून दिल्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या सुमारे ३ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीतून हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या बंधाऱ्यात स्नान घाट, रेलिंग, प्रकाश व्यवस्था, संरक्षण भिंत, पार्किंग व सभामंडप यांसारख्या सुविधांचा समावेश आहे. तसेच या मठासाठी १० कोटी रुपयांच्या निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

मतदारसंघात सुमारे ११०० कोटी रुपयांच्या निधीतून तीन उच्च पातळी बंधारे उभारले जात असून त्यातील सर्वात मोठा प्रकल्प किनवट-माहूर मतदारसंघात होत असल्याचे त्यांनी सांगितले. धनोडा उच्च पातळी बंधारा पूर्ण झाल्यानंतर माहूर येथील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी होईल, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच सहस्त्रकुंड प्रकल्प मंजुरीसाठी प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून त्याद्वारे सुमारे २२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी आमदार बाबुराव कोहळीकर व किसनराव वानखेडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधाकर कचकलवार यांनी केले.



**नांदेड- तापत्या उन्हाच्या झळा फक्त माणसांनाच नाही, तर निसर्गातील मुक्या जीवांनाही तेवढ्याच तीव्रतेने जाणवत आहेत. उन्हाची तीव्रता वाढत असताना पाण्याचा एक थेंबही त्यांच्या जगण्यासाठी अमृत ठरत आहे.**

**याच जाणिवेतून पक्षी मित्रांनी आपल्या घराच्या अंगणात, परसबागेत आणि गच्चीवर मातीच्या भांड्यात पाण्याची सोय करण्यास सुरुवात केली. हळूहळू पक्षी त्या ठिकाणी येऊ लागले, थेंबभर पाण्याने आपली तहान भागवू लागले आणि या छोट्याशा उपक्रमाने निसर्गाशी एक जिव्हाळ्याचं नातं पुन्हा जुळू लागलं.**

**आजच्या या दिवशी प्रत्येकाने आपल्या परिसरात पक्ष्यांसाठी पाण्याची सोय करावी, हीच एक छोटी पण मोलाची मानवतेची कृती ठरेल. (पक्षी मित्र, छायाचित्रकार विजय होकर्णे, नांदेड)**

## माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरसेटवार मित्र मंडळाच्या वतीने इफ्तर पार्टी

**देगलूर** -माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे शहराध्यक्ष मोगलाजी शिरसेटवार मित्र मंडळ यांच्या वतीने देगलूर येथे रमजान ईद निमित्त इफ्तार पार्टी दि. १८ मार्च रोजी देगलूर येथील गुमद बेस येथे आयोजित करण्यात आली होते्. यावेळी मुस्लिम बांधवासह हिंदू व इतर धर्मीय बांधव एकत्र होऊन या इफ्तार पार्टीचा आस्वाद घेतला. शिरसेटवार यांच्या वतीने मागील आठ वर्षापासून या इतर पार्टीचे आयोजन करून हिंदू मुस्लिम एकोपा आणि सामाजिक ऐक्य जोपासले जात आहे. याप्रसंगी पोलीस विभागीय अधिकारी संकेत गोसावी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मारुती मुंडे, तत्कालीन मुख्याधिकारी रामदास पाटील सुलतानकर, नगरसेवक बालाजीराव रोयलावार, माजी उपनगराध्यक्ष तथा स्विकृत सदस्य अविनाश निलमवार, विरोधी पक्षनेते मीरामोहिय्योदीन, माजी नगरसेवक तथा विद्यमान नगरसेवक प्रतिनिधी महेबूब शेख, नगरसेवक शत्रुघ्न वाघमारे, नगरसेवक लालू कोयलावार, नगरसेवक लक्ष्मण कंधारकर, नगरसेवक मोहितोद्दीन साहब, माजी नगरसेवक धोंडीबा कांबळे, नगरसेवक प्रतिनिधी राजा कांबळे, नगरसेवक प्रतिनिधी शेख आहाद, विष्णुकांत पाटील, वाय.जी्.सोनकाबळे, गोविंद आऊलवार, सुभाष अल्लापुरकर आदीं मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## मंगळवारी नायगाव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड-** जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार २४ मार्च २०२६ रोजी परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्ह /रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधी साठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी मंगळवार २४ मार्च २०२६ सकाळी १० वा. पासून परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे. अधिक माहिती व संपर्कासाठी मा. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आनंदनगर रोड, बाबानगर नांदेड ईमेल आयडी परपवशवीक्षसरी०१सारळश्र.लो दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ व सय्यद रज्जाक ९४२३७४८००८ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

## मिनी ट्रॅक्टर योजनेत अर्ज करण्यासाठी २७ मार्च अंतिम मुदत

**नांदेड-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन २०२५-२६ या वर्षासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गटांना ९ ते १८ अश्वशक्ती क्षमतेचे मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ९० टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत लाभ घेऊ इच्छिणाऱ्या बचत गटांनी आपले अर्ज सादर करण्यासाठी तसेच त्रुटींची पूर्तता करण्यासाठी २७ मार्च २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. ज्या बचत गटांनी योजनेसाठी अर्ज प्राप्त करून घेतले आहेत, परंतु अद्याप भरून समाज कल्याण कार्यालयाकडे सादर केलेले नाहीत, तसेच ज्यांच्या अर्जांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत, त्यांनी निश्चित मुदतीत आपले अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयात सादर करावेत. अपूर्ण अथवा त्रुटीयुक्त अर्जांची आवश्यक पूर्तता करून घेणे अनिवार्य आहे. अर्जातील त्रुटींबाबत माहिती मिळवण्यासाठी संबंधितांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयाशी संपर्क साधावा. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज किंवा त्रुटींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत कृषी अवजार बँकेसाठी अनुदान

**नांदेड-** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या (पोकरा) दुसऱ्या टप्प्यांतर्गत जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या आणि महिला बचत गटांना कृषी व्यवसायात भरारी घेण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. या योजनेंतर्गत गावपातळीवर 'कृषी अवजार बँक' स्थापन करण्यासाठी प्रकल्प मूल्यांच्या ६० टक्के म्हणजेच कमाल २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. या उपक्रमासाठी प्रकल्प गावातील उमेद आणि माविम यांच्याद्वारे पुरस्कृत महिला बचतगट तसेच गाव संघ पात्र राहतील, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. या योजनेच्या लाभासाठी संबंधित गटात वेगवेगळ्या कुटुंबातील किमान १० सदस्य असणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे, ज्या गटांनी यापूर्वी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून कृषी अवजार बँकेचा लाभ घेतला आहे, ते गट अपात्र राहतील. एका गावातून एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास निवड प्रक्रीया ऑनलाईन लॉटरी पध्दतीने केली जाईल, यासंबंधीचे निर्देश कृषी विभागाने दिले आहेत. या कृषी अवजारांची करता येणार खरेदी निवड झालेल्या गटांना गावस्तरावर अवजार बँक स्थापन करण्यासाठी विविध प्रकारची कृषी यंत्रसामग्री अपेक्षित आहे. यात प्रामुख्याने ट्रॅक्टर चलित अवजारे, बीबीएफ यंत्र, रोपणी व लावणी यंत्र, मल्चिंग मशीन, कम्बाइन हार्वे स्टर आणि फवारणी पंप यासारखी आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करता येईल. शासकीय योजनेचा लाभ घेता येईल.

## बिलोलीत चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



तभा वृतसेवा
बिलोली, दि. २० मार्च-

महाड चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त बिलोली शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन महेंद्र गायकवाड यांनी केले होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय यासाठी त्यांनी दिलेल्या लढ्याची आठवण यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाला नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर, नगरसेवक अब्दुल फिरदोस, नितीन देशमुख, शिवाजी गायकवाड, गंगाधर पुपलवार, वासिम बेग इनामदार, राजू कुडके, सादिक पटेल, डॉ. मनोज शंखपाळे, पत्रकार रत्नाकर जाधव, मुकिंदर कुडके,शेख रसूल, प्रदीप पोवाडे, हंसराज पोवाडे, मारोती भाटापुरकर, धम्मपाल जाधव आदींची उपस्थिती होती.

या प्रसंगी हंसराज पोवाडे व मारोती भाटापुरकर यांची महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सुरू असलेल्या सुशोभीकरण कामाचीही यावेळी पाहणी करण्यात आली.

## लोहा उपनिबंधक कार्यालयात दलालांचा सुळसुळाट

तभा वृतसेवा
लोहा, दि. २० मार्च-

उपनिबंधक कार्यालयात अधिकाऱ्याचा बेपत्ता असल्याने दलाचा सुळसुळाकट झाला असुन मुळ कामाला बगल ,बोगस कामाला लाईन असा धंदा फोफावला आहे.

लोहा तहसील कार्यालयातील वरच्या मजल्यावर उपनिबंधक कार्यालय आहे. तालुक्यातील शेती, जमीन खरेदी विक्री करण्यासाठी उपनिबंधक कार्यालयात नोंद केल्याशिवाय व्यवहाराला शासन मान्यता ग्राह्य धरले जात नाही व खरेदी विक्रीला मान्यता प्राप्त होत नाही. परंतु या कार्यालयात कोणतेच नियम पाळले जात नाही.आधिकारी नसले की नागरिकांच्या खरेदी विक्रीसाठी झुंबडीवर झुबंडी दाखल होतात.

शेती मुल्यांकन व मुद्रांक शुल्क कमी करून कागदपत्रे ऑनलाईन केले जातात.उपनिबंधक कार्यालयात कोणत्याच कागदपत्राची कसुन पडताळनी केली जात नाही. अधिकारी कागद पत्राची पडताळणी करतात पण दलालाच्या हितासाठी काही गोष्टींकडे कानाडोळा केला जातो. आधिकारी कार्यालयाला नियमित येत नाहीत शासकीय कामाचा बहाना करून दांडी मारली जाते. आधिकाऱ्याच्या लहरी पणामुळे दलाल एका दिवसात रजिस्ट्री करून देण्याचा ठेका घेतात. अधिकारी कार्यालयात असले की ऑनलाइनचा प्रॉब्लेम आहे असे ठसाकावून सांगितले जाते.कार्यालयात आधिकारी उपस्थीत असले की नागरिकाची ये... जा.... सुध्दा कमीच आसते . कार्यालयात अधिकाऱ्याची अनुउपस्थीती आसली की रजिस्ट्री (बैयनामा) करण्यासाठी नागरिकांची झुंबर उडते यातुनच दलालांचे उखळ पांढरे होते, याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन नागरिकाची होणारी आर्थिक लुट थांबवावी अशी मागणी जोर धरत आहे.

लोहा तालुक्यातील काही भाग विष्णुपुरी धरणक्षेत्रा खाली येत असल्याने त्या भागातील जमिणीचे मुल्यांकन बागायत क्षेत्र म्हणुन दरसुचीत नोंद झाली आहे. अनेक शेतकऱ्यांची कोरडवाहू जमिन असली तरी धरणामुळे जमिनी बागायती क्षेत्रात नोंद झाली आहे . यामुळे जमिणीचे मुद्रांक शुल्कात वाढ झाली आहे.लिंबोटी धरणामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी बागायती क्षेत्र सुची झाल्याने मुंद्राक शुल्कात वाढ झाली आहे. विष्णुपुरी व लिंबोटी धरणाच्या कानॉनमुळे कोरडवाहू जमिनीची बागायती शेतीमध्ये वर्गीकरण झाले आहे. बागायती जमिनीचे मुल्यांकन दर वाढ झाली आहे पण मागील काळात अनेक जमिणी कोरडवाहू क्षेत्र परिसर होता . दोन धरणामुळे शासन मुल्यांकन दर सुचीमध्ये बागायती क्षेत्र म्हणून नोंद झाल्याने अनेक शेतकरी खरेदी विक्री करत आहेत.काही शेतकरी आडचणित आसल्याने शेतीचा विक्रीचा व्यवहार करतात. दलाल अधिकाऱ्याला अंधारात ठेवून शेती क्षेत्राचे बागायती मुल्यांकन न भरता कोरडवाहू क्षेत्र दाखवून शासनाची फसवणूक करुन तात्काळ रजिस्ट्री करुन देत आहेत.

लोहा उपनिबंधक कार्यालयात अश्रफ शेख यांची नियुक्ती आहे. प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्याची मुळ नियुक्ती नांदेड येथे आसल्याने लोहा उपनिबंधक कार्यालयाचा अतिरिक्त पदभार यांना दिला आहे . प्रतिनियुक्तीवरील अधिकारी दोन दिवस नांदेड येथे राहातो तर लोहा येथे दोन दिवस हाजरी लावतो. मंध्यांतरीच्या काळात नोंद झालेले बैयनामे जमतील तेवढे ऑपरेटर ऑनलाइन नोंदी करुन ठेवल्या जातात, अधिकारी आल्यानंतर फाईलवर सही करून दिले जाते शेतीच्या व प्लाट धारकाला खरेदी व विक्री व्यवहाराचे पेपर सहा ते सात दिवसा नंतर दिले जातात. अधिकारी सकाळच्या वेळी नांदेड येथे राहातो, दुपारच्या नंतर लोहा येथे असतो, वरिष्ठांनी लक्ष देऊन यावर आवर घालावा अशी मागणी होत आहे.

## शासकीय आश्रमशाळा एकघरी येथे शास्त्रीय संगीत, गायन कार्यशाळा

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २० मार्च-



एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट व फकीरा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बळीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने न्युक्लीअस बजेट योजने अंतर्गत शासकीय आश्रमशाळा एकघरी तालुका हिमायतनगर जिल्हा नांदेड येथे दि२० नोव्हेंबर २०२५ ते २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत असे तीन महिन्याचे शास्त्रीय संगीत,गायन, हर्मोनियम,तबला वादन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ंगीत म्हणजे केवळ मनोरंजन करणे एवढेच नसुन, त्यामधून विध्यार्थ्यांच्या मानसिक ,भावनिक, बौध्दिक,व्यक्तिमत्त्वाचा विकास साधण्यासाठी महत्वाची भुमीका बजावते,संगीतामुळे स्मरणशक्ती, एकाग्रता आणि शिस्त वाढवते, तसेच तणाव कमी करून अभ्यासातील कार्यक्षमता सुधारते, असे प्रतिपादन फकिरा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अध्यक्ष संतोष तेलंग यांनी केले.

संगीत प्रशिक्षण कार्यशाळा समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका बी.एस.कांचले होते तर प्रमुख पाहुणे,म्हणुन चिलकर सर, राठोड सर, वाळके सर, डवरे सर, कुमारवाड सर, घोडके सर, निम्मलवाड सर आदीची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप समारंभ गुरुवार,१६ मार्च २०२६ रोजी एकघरी येथील शासकीय आश्रमशाळा प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. समारोप प्रसंगी आश्रमशाळेतील सर्व प्रशिक्षणार्थींनी देशभक्तीपर गीत सादर केले. व आपले अनुभवाबरोबरच तीन महिन्यात अवगत झालेली कला सादर करण्याचा प्रयत्न केला असुन, या वेळी संगीत प्रशिक्षण कार्यशाळेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.फकिरा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे प्रशिक्षक माधव वाघमारे कृष्णुरकर,सविता गोदाम,सहकलाकार सुरज गायकवाड,अदिराज वाघमारे आदी कलावंतानी विध्यार्थ्यांना संगीत,गायन,तबला वादनाचे प्रशिक्षण दिले व मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईप्रसाद जळपतराव,यांनी केले तर आभारप्रदर्शन मुकेश गायकवाड यांनी केले.

## 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे पाणपोई' या उपक्रमाचा २५ वा वर्ष सुरू

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २० मार्च-

गुढीपाडव्याच्या पावन मुहूर्तावर समाजसेवेची परंपरा जपत धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या वतीने 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे पाणपोई' या उपक्रमाचा २५ वा वर्ष सुरू करण्यात आला. गुरुवारी भाजपा महानगराध्यक्ष अमर राजूरकर यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान मोर्चाचे राम अय्यर होते, तर भाजपा उपाध्यक्ष बागडया यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.✻



कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकनेते कै. गोपीनाथ मुंडे, कै. गोपालसिंह ठाकूर, मातोश्री कै. वनमाला ठाकूर, कै. ॲड. श्याम जाधव, कै. बिरजू यादव, कै.लक्ष्मीबाई भुसेवाड यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक करताना ॲड. दिलीप ठाकूर यांनी या उपक्रमामागील सेवा भावना आणि सातत्याची भूमिका स्पष्ट केली.

यावेळी मार्गदर्शन करताना अमर राजूरकर म्हणाले की, उन्हाळ्यात तहानलेल्या व्यक्तीस थंड पाणी देणे हीच खरी लोकसेवा आहे. अशा उपक्रमांची गरज आज अधिक आहे. तसेच राजेश यादव यांनी ॲड. ठाकूर यांच्या विविध सामाजिक उपक्रमांचा उल्लेख करत अन्नदान, चप्पल वाटप, छत्री वितरण, ब्लँकेट सेवा व 'कायापालट' अभियानासारख्या कार्यांची माहिती दिली. देशभरातून मिळालेले १०९ पुरस्कार त्यांच्या कार्याची साक्ष देतात, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात नरसिंहराव कहाळेकर, राजेश केंद्रे, प्रेमराज कोकाटे, गोपाळ रापतवार यांनीही मनोगत व्यक्त करत ड. ठाकूर यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले. प्रमुख अतिथी म्हणून सुरेश शर्मा, स्वप्निल गुंडावार, रुपेश व्यास यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.सूत्रसंचालन अरुणकुमार काबरा यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजेशसिंह ठाकूर यांनी मानले. या उपक्रमासाठी संतोष भारती, गजू कापसे, अमोल गवळे, उद्धव इंगोले, सचिन उत्तरवार, जावेद पठाण, बालाजी जोंधळे, शेख रहेमान, गजानन मारावार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मुदखेड तालुका आणि शहर व युवक काँग्रेसतर्फे इफ्तार पार्टीचे

तभा वृतसेवा
मुदखेड, दि. २० मार्च-

मुदखेड येथे पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने शहरातील मदरसा खालिद बिन वलिद येथे दिनांक १८ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता मुदखेड तालुका व शहर तसेच युवक काँग्रेसच्या यांच्या वतीने रमजान इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले.

या इफ्तार कार्यक्रमात शहरातील मुस्लिम बांधवांसह विविध समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत रोजा सोडून एकमेकांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमातून सामाजिक ऐक्य, बंधुता आणि परस्पर सद्भावनेचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले याप्रसंगी



तिरुपती पाटील कोंडेकर, महानगरपालिकेचे गटनेते अब्दुल गफार भाई, मुदखेड तहसील कार्यालयाचे कर्तव्यदक्ष तहसीलदार आनंद देवळगावकर, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.आर.कांबळे, माजी नगरसेवक शेर अली खान, माजी नगराध्यक्ष रामराव चौधरी, तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष प्रतापराव देशमुख, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, नगरसेवक अविनाश चौंदते,

नगरसेवक खदीर भाई नवी आबादी,नगरसेवक प्रतिनिधी संजय बोकेफोड,माजी उपाध्यक्ष करीम खाँ,माजी नगरसेवक गंगाधर डांगे,सूर्यकांत चौदंते, गिरीश कोत्तावार,अनिस भाई, माणिका मुंगल,भगवान पवार, गोविंद कालाणी, गौस मुल्ला, रशीद मुल्तानी,फेरोज नवीआबादी, प्रशांत मुंगल,इलियास अब्बासी, शिवानंद देवके,विठ्ठल आचार्य,गजानन संबोड,वेदांत शेवटे,खदीर भाई कुरेशी,शहर सचिव अतीख अहेमद, प्रा.संदीप देशमुख,विश्वंभर पाटील पवार,अंकुश मामीडवार ,रमेश बोडके,भिमराव महादवाड,पत्रकार संघाचे जिल्हा सरचिटणीस ईश्वर पिन्नलवार,संतोष पाटील गाडे, पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते,सुभाष चौदंते,

नामदेव राहरे,संतोष दर्शनवाढ,मोहम्मद हकीम, महम्मद बुरहाण,राहुल आप्पा चौदंते सहित आदींची याप्रसंगी उपस्थिती होती.

या प्रसंगी काँग्रेस व युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी रमजान महिन्याचे महत्त्व सांगत समाजात शांतता, एकता आणि बंधुभाव टिकवून ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी काँग्रेस व युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**काँग्रेस वगळता अन्य पक्षांना इफ्तार पार्टीचा विसर**

काँग्रेस राजकीय पक्ष वगळता इतर कोणत्याही राजकीय पक्षांनी रमजान महिन्यात इफ्तार पार्टीचे आयोजन न केले याबद्दल शहरात नागरिकात कुजबुज होताना दिसत आहे निवडणुकीच्या काळात मुस्लिम समाजाची मते सर्व राजकीय पक्षांना हवी असतात; मात्र रमजान महिन्यात इफ्तार पार्टीचे आयोजन करण्याबाबत काही पक्षांकडून अनास्था दिसून येत असल्याची चर्चा मुस्लिम समाजात सुरू आहे. विशेषतः स्थानिक पालिकेतील सत्ताधारी कडून इफ्तार कार्यक्रमांपासून दूर राहण्याची भूमिका घेतली जात असल्याने समाजात नाराजी व्यक्त केली जात आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### नातेसंबंध आदरावर उभे राहायला हवेत, व्यवहारांवर नव्हेत - शुभांगी लाटकर

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील 'गंगा माई की बेटियाँ' मालिकेत सामाजिक प्रश्नांवर प्रभावीपणे भाष्य केले जाते. सध्याच्या कथानकात हुंड्याच्या प्रथेमुळे गंगा माईला घर तारण ठेवावे लागते, ज्यामुळे भावनिक संघर्ष उभा राहतो. शुभांगी लाटकर यांनी स्त्रीची असहाय्यता आणि अंतर्गत ताकद वास्तवदर्शीपणे साकारली आहे. त्या म्हणतात की नातेसंबंध आदरावर आधारित असावेत, व्यवहारांवर नव्हे. वैयक्तिक आयुष्यातही त्या मुलींना स्वाभिमान, आत्ममूल्य आणि ठाम भूमिका घेण्याचे संस्कार देण्यावर भर देतात. आगामी भागांत गंगा माई आणि इतर पात्रे हुंड्याविरुद्ध ठाम भूमिका घेताना दिसतील.या सर्व नाट्यमय घडामोडी जाणून घेण्यासाठी पहा 'गंगा माई की बेटियां' दररोज रात्री ९ वाजता फक्त झी टीव्हीवर! १०० शब्दात करून द्या

### पुरस्कार मिळताच अभिनेता भावूक

**छत्रपती संभाजीनगर :** 'झी कुटुंब पुरस्कार २०२६'मध्ये 'गंगा माई की बेटियाँ'चा अभिनेता शिझान खानला पहिला पुरस्कार मिळताच भावनिक क्षण अनुभवायला मिळाला. विशेष सरप्राइज म्हणून त्याच्या आईनेच मंचावर येऊन पुरस्कार दिला, ज्यामुळे तो अश्रूंना आवरू शकला नाही. हा त्याच्या आयुष्यातील दुहेरी स्वप्नपूर्तीचा क्षण ठरला. आईनेही संघर्षमय प्रवास सांगत कुटुंबासाठी उभे राहण्याची ताकद अधोरेखित केली. या सोहळ्यात विविध लोकप्रिय मालिकांचे कलाकार सहभागी झाले. 'झी कुटुंब पुरस्कार २०२६' २२ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता झी टीव्हीवर प्रसारित होणार आहेत.

### गश्मीर महाजनीचा दमदार 'गोंधळ' !

**छत्रपती संभाजीनगर :** आगामी 'सालबर्डी' चित्रपटात गश्मीर महाजनी दमदार गोंधळीच्या भूमिकेत झळकणार असून, पारंपरिक गोंधळ नृत्याद्वारे कथा अधिक प्रभावी करण्यात आली आहे. 'काळरातीचा जोर वाढला' हे गाणे प्रदर्शित होताच सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मुकुंद भालेराव यांच्या गीतांना पद्मनाभ गायकवाड यांचे संगीत आणि अजय गोगावले यांचा आवाज लाभला आहे. आशिष पाटील यांनी नृत्यदिग्दर्शन केले आहे. गूढ घटनांनी वेढलेल्या सालबर्डी गावाच्या पार्श्र्वभूमीवर हा गोंधळी कथानकाला महत्त्वपूर्ण वळण देतो. अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव, राम जाधव निर्मित आणि रमेश चौधरी दिग्दर्शित हा चित्रपट १७ एप्रिलला प्रदर्शित होणार आहे.

### गुढीपाडव्यानिमित्त डोंबिवलीतील नववर्ष स्वागत यात्रेत एक खास आकर्षण

**छत्रपती संभाजीनगर :** विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिकसोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारली आहे - रविंद्र चव्हाण, भाजपमहाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डोंबिवलीतील नववर्ष स्वागतयात्रेचे यंदाचे २८ वेवर्ष होते. आपल्या हिंदू संस्कृतीच्या नव्या वर्षाची सुरुवात मंगलमय व्हावी आणि तरुणपिढीला आपल्या भारतीय संस्कृतीशी नाते टिकवून ठेवावे या उद्देशाने ही संकल्पना सांस्कृतिकडोंबिवलीत शहरातून श्री गणेश मंदिर संस्थानाच्या माध्यमातून सुरु झाली आणि याचा एकडोंबिवलीकर म्हणून कायमच अभिमान वाटतो, असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षरविंद्र चव्हाण यांनी केले. या संकल्पनेचे श्रेय आबासाहेब पटवारी आणि सुधीर जोगळेकरया भाजपा संघ परिवारातील डोंबिवलीकरांना असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

### झी कुटुंब अ‍ॅवॉर्ड्स मध्ये स्त्रीशक्तीचे प्रभावी सादरीकरण

**छत्रपती संभाजीनगर :** 'झी कुटुंब अ‍ॅवॉर्ड्स २०२६'मध्ये झी टीव्हीच्या नायिकांनी दुर्गा, काली, लक्ष्मी आणि अन्नपूर्णा यांच्या रूपातून स्त्रीशक्तीचे प्रभावी सादरीकरण केले. विविध मालिकांतील अभिनेत्रींच्या परफॉर्मन्समध्ये अभिनय, भावना आणि प्रतीकात्मकता यांचा उच्च दर्जाचा समन्वय दिसून आला. या सादरीकरणाने केवळ पुराणातील प्रतिमा नव्हे, तर आधुनिक स्त्रीचे सामर्थ्य अधोरेखित केले. हा कार्यक्रम एंटरटेनमेंट आणि सांस्कृतिक मूल्यांचा प्रभावी संगम ठरला. 'झी कुटुंब अ‍ॅवॉर्ड्स २०२६' २२ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणार असून, प्रेक्षकांसाठी हा एक भव्य आणि संस्मरणीय अनुभव ठरणार आहे.

### एण्ड टीव्हीवरील कलाकारांचा चैत्र नवरात्री दरम्यान श्रद्धा आणि परंपरांचा समतोल

**छत्रपती संभाजीनगर :** व्यस्त शूटिंग शेड्यूल असूनही एण्ड टीव्हीवरील कलाकारांनी चैत्र नवरात्रीदरम्यान श्रद्धा आणि परंपरांचा समतोल राखला. सीरत कपूर आणि रोहिताश्र्व गौड यांनी उपवास, सात्विक आहार आणि दैनंदिन पूजेद्वारे आध्यात्मिक शिस्त कायम ठेवली. सेटवरील सहयोगी वातावरणामुळे धार्मिक आचरण सुलभ झाले. नवरात्रीच्या काळात त्यांनी सकारात्मकता, शिस्त आणि कृतज्ञतेचा अनुभव घेतल्याचे सांगितले. हा सण त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यात संतुलन साधणारा ठरला असून, प्रेक्षकांनाही प्रेरणादायी संदेश देणारा ठरतो.

### 'घरवाली पेडवाली'मध्ये यक्षची एंट्री

**छत्रपती संभाजीनगर :** 'घरवाली पेडवाली' मालिकेत अंकित मोहन यांची यक्ष/मॅडी या भूमिकेत एंट्री कथानकाला नवे वळण देत आहे. रहस्य, विनोद आणि भावनिक सखोलता यांचा संतुलित संगम या पात्रात दिसून येतो. मानवी आणि अलौकिक जगाच्या सीमारेषेवर आधारित ही भूमिका प्रेक्षकांसाठी वेगळा अनुभव निर्माण करते. लतिकासोबतचे नाते आणि जीतूसोबतची मैत्री कथानक अधिक गुंतागुंतीचे व मनोरंजक बनवते. मालिकेतील हा नवीन ट्रॅक प्रेक्षक एंगेजमेंट वाढवणारा ठरणार असून, आगामी भागांमध्ये अनेक अनपेक्षित ट्विस्ट्स पाहायला मिळणार आहेत.

### पेटीएमने पेमेंटपूर्वी एकूण रक्कम तपासण्यासाठी इन-बिल्ट कॅल्क्युलेटर सादर केला

**मुंबई :** पेटीएम (वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड), भारतातील एमएसएमई आणि एंटरप्राइझेसना पूर्ण स्टॅक पेमेंट सेवा पुरवणारी अग्रगण्य कंपनी, वित्तीय सेवा वितरण करणारी कंपनी आणि मोबाईल पेमेंट्स, क्यूआर कोड्स आणि साऊंडबॉक्स यांचे पायनियर, यांनी पेमेंट स्क्रीनमध्ये इन-बिल्ट कॅल्क्युलेटर सादर केला आहे, जो पेमेंट करण्याआधी एकूण रक्कम त्वरित मोजू देतो.

# शताब्दी वर्षात संघाचे समाजजोडणीचे लक्ष्य; गृह संपर्क अभियानात १२ लाख घरांपर्यंत थेट संपर्क

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० मार्च :** संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त समाजजोडणीला गती देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या गृह संपर्क अभियानातून देवगिरी प्रांतात १२ लाखांहून अधिक कुटुंबांपर्यंत थेट संपर्क साधण्यात आला. हरियाणातील समालखा येथे झालेल्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेनंतर प्रांत संघचालक अनिलजी भालेराव यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

यावेळी पद्मश्री चैत्रामजी पवार तसेच मा. श्री. भय्याजी जोशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. देशभरात संघाच्या शाखांची संख्या ८८ हजारांवर पोहोचली असून सुमारे ६ हजारांची वाढ नोंदली



गेली आहे. 'पंच परिवर्तन' उपक्रमाद्वारे सामाजिक समरसता व सकारात्मक बदल घडवण्यावर भर दिला जात आहे.

देवगिरी प्रांतात ५१७ दैनिक शाखा, ५९८ साप्ताहिक मिलन आणि ८६ संघ मंडळी कार्यरत आहेत. विविध प्रशिक्षण वर्गांद्वारे हजारो स्वयंसेवकांना संघटनात्मक बळकटी देण्यात आली आहे. सेवा, शिक्षण, रोजगार, संस्कार आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांत ४४ उपक्रम राबविले जात आहेत.

गृह संपर्क अभियानाच्या पहिल्या टप्प्यात २१ दिवसांत १२ लाखांहून अधिक कुटुंबे आणि ६६४८ गावांपर्यंत पोहोचण्यात यश आले असून पुढील टप्प्यात हा विस्तार अधिक वाढविण्यात येणार आहे. एप्रिलपासून प्रत्येक तालुक्यात 'सामाजिक सद्भाव' बैठका आणि जिल्हास्तरावर नागरिक संगोष्ठी आयोजित केल्या जाणार आहेत.

## एमजीएममध्ये राष्ट्रीय गोलमेज परिषदेचे आयोजन

### 'मराठवाड्याच्या भविष्याची पुनर्कल्पना' विषयावर देशभरातील मान्यवर साधणार संवाद

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० मार्च :** मराठवाडा विभागाची ऐतिहासिक पार्श्र्वभूमी, भौगोलिक आव्हाने आणि सामाजिक-राजकीय वास्तवाचा सखोल अभ्यास करून या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी एक व्यापक 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी मिशन विद्यापीठात शुक्रवार, दि. २७ आणि शनिवार, दि. २८ मार्च २०२६ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

'मराठवाड्याच्या भविष्याची पुनर्कल्पना' हा या परिषदेचा मुख्य विषय असून एमजीएम विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस आणि कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने, फॅकल्टी ऑफ इंटरडिसिप्लिनरी स्टडीजच्या सहकार्याने ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

मराठवाडा हा प्रदेश दीर्घकाळ निजामाच्या राजवटीखाली राहिल्यामुळे तसेच सततच्या पाणीटंचाईच्या समस्येमुळे विकासाच्या प्रक्रियेत मागे राहिल्याचे वास्तव आहे. या पार्श्र्वभूमीवर आयोजित ही परिषद केवळ चर्चेपुरती मर्यादित न राहता, प्रदेशातील विविध समस्यांवर ठोस आणि व्यावहारिक उपाययोजना सुचविण्यावर भर देणार आहे.

परिषदेमध्ये राजकारण व प्रशासन, कृषी अर्थव्यवस्था व ग्रामीण संकट, सामाजिक विषमता, पायाभूत सुविधांचा विकास, वारसा व पर्यटन, मानसिक आरोग्य आणि हवामान बदल अशा विविध महत्त्वपूर्ण उपविषयांवर सखोल विचारमंथन करण्यात येणार आहे. विशेषतः शेतकरी आत्महत्या, ग्रामीण भागातील स्थलांतर आणि दुष्काळाचे सामाजिक परिणाम या गंभीर विषयांवर तज्ज्ञांकडून संशोधनाधारित मते मांडली जाणार आहेत.

या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठाचे कुलपती श्री. अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके आणि विभागप्रमुख डॉ.ह.नि. सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक समिती कार्यरत आहे.

या परिषदेच्या माध्यमातून मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी एक ठोस आराखडा तयार करून तो शासनाच्या धोरणनिर्मितीसाठी सादर केला जाणार असल्याची माहिती संयोजन समितीने दिली आहे.

## शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या : आ. प्रशांत बंब यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लासूर स्टेशन, दि. २० मार्च :** गंगापूर व खुलताबाद तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत बंब यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दि. १८ मार्च २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे गहू, बाजरी, ज्वारी, हरभरा यांसह भाजीपाला व फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांचे हाताशी आलेले पीक पूर्णतः वाया गेले असून, त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्र्वभूमीवर आमदार बंब यांनी तहसीलदारांना निवेदन देत परिस्थितीची गांभीर्याने दखल घेण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानाची माहिती घेण्यात आली असून, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शासनाकडे प्रस्ताव सादर करावा, असे त्यांनी नमूद केले.

**नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,अहमदनगर**

(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक) (अवसायनांतर्गत) - बँक रोड,पोस्ट बॉक्स नंबर-७, अहिल्यानगर-४१४००१

Email - recovery@nucb.in Website-www.nucb.in, Ph-0241-2343641/42,Fax No.2346951

**ताबा नोटीस रुल ८ (१)**

ज्याअर्थी,खालील सही करणार नगर अर्बन को. ऑप. बँक लि. अहमदनगर (मल्टि- स्टेट शेड्युल्ड बँक)(अवसायनाअंतर्गत) नेवासा शाखा (पुर्वीची औरंगाबाद शाखा) जि. अहिल्यानगर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ऍक्ट) २००२ ( ५४ of २००२ ) अन्वये त्यांना सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ३वाचता प्राप्त अधिकाराचा वापर करुन सिक्युरिटी इंटरेस्टच्या (एन्फोर्समेंट) नियम २००२नुसार दि.: २८/०७/२०२१ रोजी मागणी नोटीस पाठवून सूचना केली होती. कर्जदार में. यशश्री लेडीज वेअर अँड इमिटेशन ज्वेलरी, प्रोप्रा. सौ. सुरेखा अजय संचेती व जामिनदार- १) सौ.वैषाली अशोक देसर्डा २) श्री.दिनेश विष्णु डोंगरे ३)श्री.काशीनाथ सोपान लिपणे यांना कर्जाची रक्कम रू.१) हायपोथिकेशन लोन रक्कम रु.३०,८३,५३८/- (अक्षरी रु. तीस लाख त्र्याऐंशी हजार पाचशे अडतीस फक्त ) व दि. ०१.०७.२०२१ पासून त्यावरील व्याज २) मुदत कर्ज रक्कम रु. ४४,५६,१७४/- (अक्षरी रु. चौरें चाळीस लाख छप्पन्न हजार एकशे चौऱ्याहत्तर फक्त ) व दि. ०१.०७.२०२१ पासून त्यावरील व्याज अशी एकूण येणेबाकी रक्कम रु. ७५,३९,७१२/- (अक्षरी रु. पंच्याहत्तर लाख एकोणचाळीस हजार सातशे बारा फक्त ) असे मागणी नोटीस दिल्याचे तारखेपासून ६० दिवसाचे आत भरण्यास सांगितले होते.

कर्जदार व जामिनदार हे वरील रक्कम परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने कर्जदार व जामिनदार आणि तमाम जनतेला सदरच्या नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, खालील सहीकरणारअधिकृतअधिकारी यांनी कलम १३(४) नियम ८ च्या अधिनियमासह खालील नमूद मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा दि. १८ मार्च २०२६ रोजी घेतला आहे. कर्जदार व जामिनदारआणितमामजनतेलासूचितकरण्यातयेतेकी, खालील मालमतेबाबत कोणीही व्यवहार करू नयेत. केल्यास ते वरील थकीत १) हायपोथिकेशन लोन रक्कम रु.३०,८३,५३८/- (अक्षरी रु. तीस लाख त्र्याऐंशी हजार पाचशे अडतीस फक्त ) व २) डब्लू सी टी एल रक्कम रु. ४४,५६,१७४/- (अक्षरी रु. चौरेंचाळीस लाख छप्पन्न हजार एकशे चौऱ्याहत्तर फक्त ) व दि. ०१.०७.२०२१ पासून त्यावरील व्याज अशी एकूण येणेबाकी रक्कम रु. ७५,३९,७१२/- (अक्षरी रु. पंच्याहत्तर लाख एकोणचाळीस हजार सातशे बारा फक्त ) व दि. ०१.०७.२०२१ पासून त्यावरील व्याजासह असे नगर अर्बन को. ऑप. बँक लि. अहमदनगर(मल्टि- स्टेट शेड्युल्ड बँक)यांना देण्यास बांधील राहतील.

सुरक्षित मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदीकडे कर्जदार व जामिनदार यांचे लक्ष वेधण्यात आले आहे. अचल मालमत्तेचा तपशील - खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे नोंदणीकृत गहाणः डीस्ट्रीक्ट औरंगाबाद आणि सब डीस्ट्रीक्ट वैजापूर पैकी वैजापूर येथील लिहून देणार यांची घर जागा मिळकत याचा सिटी सर्व्हे नंबर ४३५३ , म्युनिसिपल घर नंबर १/९४८ चे क्षेत्रफळ १३३.९० चौ मी. हि संपूर्ण मिळकत त्यावरील संपूर्ण बांधकामासह यासी चतु : सीमा खालीलप्रमाणे : - पूर्व :- वाळकर यांची घर मिळकत पश्चिम:- गुलाबचंद संचेती यांची मालमत्ता दक्षिण:- टिळक रोड उत्तर: नगरपरिषद रस्ता

दि. : १८/०३/२०२६
ठिकाण : वैजापुर, ता. वैजापुर
जि. छत्रपती संभाजीनगर

प्राधिकृत अधिकारी
नगर अर्बन को. ऑप.बँक लि.(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्रशासनाधिन अवसायानाअंतर्गत, अहिल्यानगर

ARL

## श्री स्वामी समर्थ महाराज प्रगट दिनानिमित्त व हिंदू नववर्षानिमत्त भव्य शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर, दि. २० मार्च :** श्री स्वामी समर्थ महाराज प्रगट दिन व हिंदू नववर्षानिमत्त श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने दि.१९ ( गुरुवार ) शहरातून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रतिमेचे शोभा यात्रा काढण्यात आली. शहराच्या मुख्य मार्गावरून काढण्यात आलेल्या शोभा यात्रेचे ठिक ठिकाणी महिलांनी स्वागत करून पुजन करण्यात आले. यावेळी सर्व महिलांनी आपल्या घरासमोर सडा,रांगोळीने सजावट केलेली होती.

यावेळी तुळजाभवानी मंदिरा समोर स्वामींची व देवीची आरती सेवा रुजू करण्यात आली त्यानंतर स्वामी समर्थ केंद्राकडे नेऊन तेथे सेवेकऱ्यांना मार्गदर्शन पर हितगुज करण्यात आले. दि.२० शुक्रवारी महाआरती नंतर भाविक भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी माजी जिल्हा प्रतिनिधी झुंजार राव काकडे, तालुका प्रतिनिधी गोपीनाथ प्रधान, कर सल्लगार शांतीलाल जाधव , सुधाकर सपकाळ, योगेश पाटील, रवि पाटील, संदिप काटकर, सुभाष राजपूत,करण राजपूत, वाल्मीक टेमकर,रमेश कंठली , बप्पा वाडकर, मनोज पाटील लक्ष्मण कदम, निता कदम ,सुनिता शर्मा, सुनिता सोळके, सायली धुमाळ, सुनिता खंडागळे, मंगल सपकाळ, शोभा प्रधान, उज्वला काटकर, विद्या सूर्यवंशी, हिरा चव्हाण , आदी अनेक पुरुष व महिला यांची उपस्थिती होती

**जाहीर प्रगटन**

अर्जदार : श्री.करण विष्णू बाबर
रा.मिसरवाडी, ता. जि. छत्रपती संभाजीनगर
विरुध्द
गैरअर्जदार : उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.वै.म.व रू. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

संदर्भ : श्री.करण विष्णू बाबर, रा.मिसरवाडी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दि.२३.१२.२०२५

विषयाकींत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगी नामे, अयोध्या करण बाबर यांचा दिनांक १६.०१.२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री.करण विष्णू बाबर यांचे मुलगी नामे, अयोध्या करण बाबर यांची जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.वै.म.व रू. छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे मुलगी नामे, अयोध्या करण बाबर यांचा दिनांक १६.०१.२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करून लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर आक्षेप/हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक २०/०३ /२०२६ रोजी देण्यात आले.

दिनांक : २०/३/२०२६
ठिकाण : छत्रपती संभाजीनगर.

उप विभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी,
छत्रपती संभाजीनगर करीता

**जाहीर प्रगटण/सायटेशन नोटीस**

**मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.१७३/२०२६

अर्जदार

१) अनिताबाई संजय वाघचौरे वय ४५ वर्षे धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) गणेश संजय वाघचौरे वय २५ वर्षे धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) गौरव संजय वाघचौरे वय २१ वर्षे धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सौ. निर्मला ज्ञानेश्वर कन्हाळे, वय २६ वर्षे धंदा शेती रा गल्लेबोरगाव ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर ५) सौ. कार्तिकी आबासाहेब चव्हाण वय २१ वर्षे धंदा शेती, रा. चिकलठाण ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.वी. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, पंढरीनाथ रामभाऊ वाघचौरे व कडुवाई पंढरीनाथ वाघचौरे हे दांपत्य मौजे मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते, त्यापैकी पंढरीनाथ रामभाऊ वाघचौरे हे दिनांक ०४/०९/२०२१ रोजी मौजे मांजरी ता. गंगापुर येथे मयत झालेले असुन कडुबाई पंढरीनाथ वाघचौरे या दिनांक २२/०८/२०१९ रोजी मयत झालेल्या आहे. दोन्ही मयत पंढरीनाथ रामभाऊ वाघचौरे व कडुबाई पंढरीनाथ वाघचौरे यांना एक वारस मुलगा नामे संजय पंढरीनाथ वाघचौरे हा होता, तो देखील दिनांक १९/०१/२०१४ रोजीच मयत झालेला आहे, मयत संजय यांना अर्जदार क्र.१ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ हे मुले आणि अर्जदार क्र.४ व ५ या विवाहीत मुले असे कायदेशीर वारसदार आहेत, येणे प्रमाणे मयत पंढरीनाथ रामभाऊ वाघचौरे, मयत कडुवाई पंढरीनाथ वाघचौरे व मयत संजय पंढरीनाथ वाघचौरे यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याने मयताचे पश्र्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक ४/०५/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १८/०३/२०२६ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापुर

**जाहीर प्रगटण/सायटेशन नोटीस**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हील एम.ए. क्र.२८/२०२६

अर्जदार :-

१) जनाबाई भ्र. कैलास ढंगारे, वय ७५ वर्षे धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) नितीन कैलास ढंगारे वय ३७ वर्षे, धंदा शेती रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) अर्चना भ्र. शंकर पुंड, वय ४३ वर्षे धंदा गृहिणी रा. शिंगवे तुकाई ता. नेवासा जि. अहिल्यानगर ४) अनुपमा भ्र. राजु पवार, वय ३९ वर्षे धंदा गृहिणी रा. गोपीनाथ नगर, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण-कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र. १ ही त्यासर्वांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे कैलास भानुदास ढंगारे हे मौजे मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक १५/०८/२०२५ रोजी मौजे मांजरी ता. गंगापुर येथे मयत झाले आहे, मयत कैलास भानुदास ढंगारे यांचे वडील नामे भानुदास बंडुजी ढंगारे हे दिनांक १७/०१/२००५ रोजी मयत झाले असुन मयताची आई नामे साळुबाई भानुदास ढंगारे या दिनांक २१/०६/२०१४ रोजी मयत झालेल्या आहे. मयत कैलास भानुदास ढंगारे यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १८/०३/२०२६ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०१/०४/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

**जाहीर प्रगटण/सायटेशन नोटीस**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए. क्र. १६१/२०२६

अर्जदार

१) परिगाबाई भ्र. मुरलीधर हिवाळे, वय ७१ वर्षे धंदा शेती रा. भिवधानोरा ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) सुनिल पि. मुरलीधर हिवाळे, वय ४६ वर्षे धंदा शेती, ३) अनिल पि. मुरलीधर हिवाळे, वय ४० वर्षे धंदा शेती, ४) सचिन पि. मुरलीधर हिवाळे, वय ३८ वर्षे धंदा शेती, ५) संतोष मुरलीधर हिवाळे वय ३४ वर्षे धंदा शेती, अर्जदार क्र.२ ते ५ रा. लांझी ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६) सौ. ज्योती रामनाथ सातपुते, वय४२ वर्षे धंदा गृहिणी रा. हनुमान मंदिराजवळ लांझी ता. गंगापुर जि. औरंगाबाद ७) सौ. शैला बाळु सोनवणे, वय ३८ वर्षे धंदा गृहिणी रा. काटेपिंळगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:-कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, मुरलीधर फकीरराव हिवाळे हे मौजे भिवधानोरा ता गंगापुर जि. औरंगाबाद येथील रहिवाशी होते ते दिनांक १५/०८/२०२० रोजी मौजे भिवधानोरा ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे. मयत मुरलीधर फकीरराव हिवाळे यांना अर्जदार क्र.१ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.२ ते ५ हे मुले व अर्जदार क्र.६ व ७ या मुली असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १८/०३/२०२६ दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक २८/०४/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

**जाहीर प्रगटण/सायटेशन नोटीस**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हील एम.ए. क्र.१२८/२०२६

अर्जदार

१) जहुराबी रसुल पठाण, वय ७७ वर्षे धंदा गृहिणी,
२) महेमुद रसुल पठाण, वय ४८ वर्षे धंदा शेती,
३) मकसूद रसुल पठाण, वय ४३ वर्षे धंदा शेती,
४) असदखान रसुलखान पठाण, वय ४१ वर्षे धंदा शेती,
५) नजीर रसुलखॉ पठाण, वय ३९ वर्षे धंदा शेती,
६) बशीर रसुलखान पठाण, वय ३७ वर्षे धंदा शेती,
७) जावेद रसुलखॉ पठाण, वय ३५ वर्षे धंदा शेती,
८) सलिमखाँ रसुलखॉ पठाण, वय ३२ वर्षे धंदा शेती,
९) अलिम रसुल पठाण, वय २४ वर्षे धंदा शेती,
सर्व रा. खोजेवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर
१०) परवीन भ्र. रफिक शेख, वय ३३ धंदा घरकाम
रा. घुसूर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर
११) फरीन भ्र. नजीर शेख, वय २६ वर्षे धंदा घरकाम
रा टाकळी राजाराय ता खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार -निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.२ ते ९ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१० व ११ या त्यांच्या बहिणी आहेत व अर्जदार क्र.१ ही त्यासर्वांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ११ यांचे वडील नामे रसुलखा पठाणखा पठाण हे मौजे खाजेवाडी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०६/१२/२०२५ रोजी मौजे खोजेवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत रसुलखा पठाणखा पठाण यांना अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १८/०३/२०२६ दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०९/०४/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर